① ⑥ (MAGA)
(म.रा.वि.प्र.३.२११०)

"महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम"राज्यामध्ये राबविण्याबाबत ..

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/सीआर-४३/२००८/पोल-१५,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑगस्ट, २००८.**

वाचा:-१) शासन निर्णय क्रमांक एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै, २००७
२) शासन परिपत्रक क्रमांक:तंमुगा-१००८/प्र.क्र.२२/पोल-१५, दिनांक ३ सप्टेंबर, २००७
३) शासन निर्णय क्रमांक: तंमुगा-१००९/प्र.क्र.३७/पोल-१५, दिनांक २८ सप्टेंबर, २००७
४) शासन परिपत्रक क्रमांक:तंमुगा-१००८/प्र.क्र.२२/पोल-१५, दिनांक १४ नोव्हेंबर, २००७
५) शासन शुद्धिपत्रक क्रमांक:तंमुगा-१००८/प्र.क्र.२२/पोल-१५, दिनांक १४ नोव्हेंबर, २००७
६) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १०१२/सीआर-७०/पोल-१५, दिनांक २६ डिसेंबर, २००७
७) शासन परिपत्रक क्रमांक:तंमुगा-१००८/प्र.क्र.१३/पोल-१५, दिनांक १७ जानेवारी, २००८
८) शासन शुद्धिपत्रक क्रमांक एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-१५, दिनांक २६ मार्च, २००८
९) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक ११ एप्रिल, २००८
१०) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/सीआर-२०/पोल-१५, दिनांक ११ एप्रिल, २००८
११) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/सीआर-२५/पोल-१५, दिनांक १६ एप्रिल, २००८
१२) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००९/प्र.क्र.३४/पोल-१५, दिनांक ६ मे, २००८
१३) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/सीआर-२०/पोल-१५, दिनांक १४ मे, २००८
१४) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/प्र.क्र.३६/पोल-१५, दिनांक १७ जून, २००८
१५) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक १७ जून, २००८
१६) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक १४ जुलै, २००८
१७) शासन निर्णय क्रमांक तंमुगाः १००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक ३१ जुलै, २००८

**प्रस्तावना :-** जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत या राष्ट्रातील, महाराष्ट्र हे सजग, क्रियाशील व अनेक समाजाभिमूख योजना अंमलबजावणीत आद्यप्रवर्तक असे राज्य आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १०२.८६ कोटी असून, लोकसंख्येत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राची लोकसंख्या ९.६८ कोटी (भारतातील लोकसंख्येच्या प्रमाणात ९.४ %) असून, राज्यामध्ये अनेक धर्म, पंथ, जाती, उपजाती, त्याच बरोबर स्थित, विस्थापित व स्थलांतरित अशा अनेक घटकांचे लोक रहात असून ते अनेक प्रकारचे व्यवसाय, व्यापार व उदीम आचरितात. या लोकांच्या विविध परंपरा, चालीरिती, सण, उत्सव, वेशभूषा, विचार व आचार, इत्यादींमधून राज्यात एक बहुविध समाज प्रतिबिंबित होतो. राज्यात भौगोलिक विविधतेबरोबरच सामाजिक विविधता असून, आर्थिक क्षेत्रातही कमी अधिक उत्पन्नाचे सामाजिक घटक आहेत. सामाजिक, आर्थिक मागासलेपण, निरक्षरता, अज्ञान, आर्थिक व सामाजिक विषमता, बेरोजगारी यामुळे समाजात स्थिर शांती निर्माण होण्यास अडसर येतो आणि त्यातून भांडण तंट्यांचे प्रमाणही मोठे असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.



एच १२७४—१

राज्यात विविध स्तरावरील न्यायालयांमध्ये दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे दावे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत. न्यायव्यवस्थेवरील खटल्यांचा भार दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये, लोकांना लवकरात लवकर व कमी खर्चात न्याय मिळवून देण्यासाठी पर्यायी व्यवस्थेच्या आवश्यकतेच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालय व केंद्र शासनाकडून यापूर्वी काही पर्यायी न्यायव्यवस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. तंटे निकाली काढण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून सन १९८० मध्ये लोकन्यायालयाची स्थापना करण्यात आली. तालुका व गाव पातळीवर लोकन्यायालये भरवून जलद गतीने खटले निकाली काढण्याचे काम त्यामार्फत केले जाते. ॲड.सालेम विरुद्ध केंद्र शासन या याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने कोर्टामध्ये प्रलंबित खटले कमी करण्यासाठी सिव्हील प्रोसिजर कोड, कलम ८९ मध्ये योग्य ते बदल करून Alternative Dispute Resolution (ADR) System सारखी प्रभावी यंत्रणा राबविण्याबाबत निर्णय घ्यावा, असे केंद्र शासनास निर्देश दिले होते. त्यानुसार पर्यायी तंटा निवारण पद्धती (ADR) ही व्यवस्था सध्या नव्याने अस्तित्वात आली असून, तंटे सोडविण्याचे हे नवीन माध्यम अलिकडच्या काळात प्रभावी होत आहे. सदर प्रणालीद्वारे चांगल्या वातावरणात तडजोड होऊन परस्परांमध्ये तेढ निर्माण न होता तंटे मिटविले जातात. तसेच केंद्र शासनाने सन १९९२ मध्ये मोठ्या प्रमाणावरील न्यायालयीन प्रकरणांच्या निर्गतीसाठी ४५० जलदगती न्यायालयाची निर्मिती केली आहे.

गाव पातळीवर छोट्या-छोट्या कारणांवरुन तंट्याची सुरुवात होते. त्यामध्ये सुरुवातीस कमी लोकांचा सहभाग असतो. छोट्या तंट्याचे पुढे मोठ्या तंट्यात रुपांतर होते. अशा मोठ्या तंट्यांत अनेक लोकांचा सहभाग येतो. कधीकधी दिवाणी तंट्यांतून फौजदारी तंटे निर्माण होतात. छोट्या कारणावरुन निर्माण झालेला तंटा मोठा होऊन पुढे फौजदारी तंटा बनतो व त्यातून कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येते. पर्यायाने असे तंटे मिटविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेवरील व न्यायिक यंत्रणेवरील ताण वाढतो. तंटे मिटविण्याकरिता लोकन्यायालये, पर्यायी तंटे मिटविण्याची व्यवस्था (ADR) या सारख्या पर्यायी व्यवस्था उपलब्ध असल्या, तरीही तंटे निर्माणच होऊ नयेत व निर्माण झालेले तंटे गावपातळीवरच मिटविले जावेत, या करिता लोकसहभागातून व्यापक मोहीम राबविल्यास ती अधिक प्रभावी व फलदायी ठरेल. गाव पातळीवर सौहार्दपूर्ण व सलोख्याचे वातावरण निर्माण करून, त्याद्वारे आपापसातील तंटे सोडविण्यासाठी लोकसहभागातून राबविली जाईल अशी मोहीम आखण्यासाठी, राज्य शासनाने मा.उप मुख्यमंत्री यांचे तत्कालीन उप सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नेमला होता. या अभ्यास गटाच्या अहवालात मोहीम आखणी, अंमलबजावणी व पुरस्कार योजनेचा आराखडा दिलेला आहे.

महाराष्ट्रात भक्ती सांप्रदायाची सुरुवात तेराव्या शतकात झाली. या संत परंपरेमधून संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा अनेक संतांनी महाराष्ट्राच्या जनतेला वैचारिक व मानसिक दिशा दिली. संताच्या शिकवणीतील सलोखा व बंधुभावाचा प्रवाह गेल्या ७०० वर्षांपासून आजही अव्याहतपणे प्रवाहित होत आहे. महाराष्ट्राला लाभलेली ही वैचारिक पार्श्वभूमी तंटामुक्तीसारखी लोक चळवळ निर्माण होण्यास पोषक अशीच आहे. म्हणून भक्ती सांप्रदायाने महाराष्ट्रात निर्माण केलेली जनजागृतीच्या आधारे पूर्वापार खेड्यांमध्ये मान्यता पावलेल्या पंच पद्धतीसारखी पद्धती लोकसहभागातून निर्माण व्हावी आणि गावात तंटे निर्माण होऊ नयेत व झालेले तंटे मिटविण्याची एक व्यापक मोहीम, अभ्यास गटाच्या अहवालाच्या आधारे उभी केली जावी आणि या मोहिमेअंतर्गत पात्र ग्रामपंचायतींना पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, असा शासनाचा मानस होता. त्या अनुषंगाने, दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरू करण्यात आली आहे.

सन २००७-०८ हे वर्ष मोहिमेचे अंमलबजावणीचे प्रथम वर्ष होते. दिनांक १९ जुलै, २००७ च्या मूळ शासन निर्णयात ज्या विविध विषयांवर तरतुदी करण्यात आल्या होत्या, त्या तरतुदींचे स्पष्टीकरण होण्याच्या दृष्टीने संदर्भित अनुक्रमांक १ ते १७ शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. मोहिमेस प्रथम अंमलबजावणी वर्षातच राज्यात चांगला प्रतिसाद लाभला असून, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसहभाग लाभला आहे. मोहीम अंमलबजावणीतील प्रथम वर्षाचा अनुभव, विविध स्तरातून आलेल्या सूचना व भविष्यात अंमलबजावणी

करणे सुकर व्हावे, या दृष्टीने सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक होते. ही बाब विचारात घेऊन वरील अनुक्रमांक १ ते १७ शासन निर्णय निरस्त करण्यात येत असून, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम व पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

गाव पातळीवर छोट्या छोट्या कारणावरुन निर्माण होणाऱ्या तंट्यांचे पर्यवसन मोठ्या तंट्यात होऊ नये, वादामध्ये मत्ता अडकून पडून त्यातून आर्थिक नुकसान होऊ नये, कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येऊ नये, यादृष्टीने गावात तंटे निर्माण होणार नाहीत व अस्तित्वात असलेले तंटे लोकसहभागातून सामोपचाराने आणि आवश्यक तेथे प्रशासनाची मदत घेऊन सोडविण्याची व्यवस्था निर्माण व्हावी याकरिता शासनाने सन २००७ पासून **"महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम"** सुरु केली आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, दाखल झालेले तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे असे सदर मोहीमेचे तीन भाग आहेत. या तीनही भागातील कार्यवाही व तंटे मिटविण्याची मोहीम ही लोकचळवळ म्हणून राबविली जावी आणि त्या माध्यमातून गावे तंटामुक्त व्हावीत, या भूमिकेतून तंटामुक्त होणाऱ्या गावांना समारंभपूर्वक पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचे स्वरूप, लोक न्यायालयाचा सहभाग, मूल्यमापनाचे निकष, मूल्यमापनाची यंत्रणा, मूल्यमापनासाठी मार्गदर्शक तत्वे, पुरस्कार योजना, पुरस्कार रकमेचा विनियोग, प्रचार व प्रसार, इत्यादींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

## २. उद्दिष्टे

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेसाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे ठरविण्यात येत आहेत:---

१) गाव पातळीवर तंटे निर्माण होऊ नयेत म्हणून उपक्रम राबविणे,

२) दाखल असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या तंट्यांचे निराकरण करून ते कमी करणे,

३) गावासाठी गावातच लोकसहभागातून तात्काळ व सर्वमान्य तडजोड घडवून आणण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे,

४) गावातील जनतेमध्ये जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणे,

५) पोलिसांच्या कामामध्ये पारदर्शकता आणून त्यांची जनमानसातील प्रतिमा सुधारुन जनतेचे सेवक अशी प्रतिष्ठा प्राप्त करणे,

६) लोकांच्या सहकार्याने अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्याचे निर्मूलन करणे,

७) भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी गावपातळीवर प्रयत्न करणे,

८) अनिष्ट प्रथा व चाली-रीती नष्ट करण्यासाठी लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करणे.

## ३. मोहिमेचे स्वरूप व मोहीमकेंद्रित तंटे

३.१ गावात तंटे होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, अस्तित्वातील व निर्माण होणारे तंटे सामोपचाराने मिटविणे हे मोहिमेचे स्वरूप आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत पुढीलप्रमाणे ४ प्रकारातील तंटे ग्रामपंचायत पातळीवर मिटविण्यासाठी विचारात घेण्यात येतील.



एच १२७४—१अ

(अ) **दिवाणी-** स्थावर मालमत्तेचे मालकी हक्क, वारसा हक्क, वाटप, हस्तांतरण, इत्यादी तसेच भाडेपट्टा, जंगम मालमत्तेची खरेदी-विक्री, हस्तांतरण, गहाण व कर्ज व्यवहार, रकमांची देवाणघेवाण, पोटगी, इत्यादी व इतर कारणांवरून निर्माण झालेले सर्व दिवाणी वाद/तंटे.

(ब) **महसुली-** शेतीचे मालकी हक्क, वारसा हक्क, हद्दी, अतिक्रमणे, वाटप त्याचप्रमाणे गावठाणातील जागा, गोठे, परडे यांचे मालकी हक्क, हद्दी आणि खुणा यांवरून निर्माण झालेले तंटे. कूळ कायदा, वतन कायदा, जमीनविषयक इतर विविध कायदे, सार्वजनिक रस्ता व शेतात जावयाचा रस्ता, इत्यादी व इतर कारणांवरून निर्माण झालेले सर्व तंटे.

(क) **फौजदारी-** शारीरिक, मालमत्ता आणि फसवणूक यासंबंधीचे अदखलपात्र (एन.सी.) व दखलपात्र फौजदारी गुन्ह्यांपैकी जे गुन्हे संबंधित पक्षकारांच्या सहमतीने व कायद्यानुसार मिटविता येऊ शकतात (compoundable) असे तंटे/गुन्हे.

(ड) **इतर तंटे-** दिवाणी, महसुली, फौजदारी तंट्यांव्यतिरिक्त सहकार, कामगार, औद्योगिक क्षेत्रातील व इतर तंटे.

३.२ जे फौजदारी तंटे कायद्यातील तरतुदीनुसार मिटविता येऊ शकणार नाहीत (Non-compoundable) अशा तंट्यांबाबत संबंधित पोलीस ठाणे अथवा संबंधित न्यायालयामध्ये योग्य ती कार्यवाही होत राहील.

## ४. मोहिमेची व्याप्ती व घटक

सदर मोहीम राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये सातत्याने राबविण्यात येईल. मोहिमेसाठी ग्रामपंचायत हा घटक विहित करण्यात येत असून, त्यात ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावे, वाड्या, वस्त्या यांचा समावेश राहील. या मोहिमेच्या प्रयोजनार्थ ग्रामपंचायतीस **"गाव"** संबोधण्यात येईल.

## ५. मोहिमेचा कालबद्ध कार्यक्रम

प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे आयोजन आणि गावातील सध्या दाखल असलेले विविध तंटे आणि नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविण्यासंबंधी राबवावयाच्या मोहिमेचा कालबद्ध कार्यक्रम **परिशिष्ट-१** मध्ये दिल्याप्रमाणे ठरविण्यात येत आहे.

## ६. मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी समित्या स्थापन करणे

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, तालुका, पोलीस ठाणे व गाव पातळीवर समित्या स्थापन करण्यात याव्यात. सदर समित्यांची रचना व कार्ये पुढीलप्रमाणे असतीलः-

### ६.१ राज्य स्तरीय समिती

**(अ) राज्य स्तरीय समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| मा. मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| मा. उपमुख्यमंत्री (गृहमंत्री) | - | सह अध्यक्ष |
| मा. मंत्री, महसूल, | - | सदस्य |
| मा. मंत्री, ग्रामविकास | - | सदस्य |
| मा. मंत्री, सामाजिक न्याय | - | सदस्य |
| मा. मंत्री, आदिवासी विकास | - | सदस्य |
| मा. मंत्री, महिला व बालकल्याण | - | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| मा. राज्यमंत्री, गृह | - | सदस्य |
| मुख्य सचिव | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (गृह) | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (महसूल) | - | सदस्य |
| पोलीस महासंचालक | - | सदस्य |
| प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) | - | सदस्य |
| सचिव, शालेय शिक्षण | - | सदस्य |
| सचिव, ग्रामविकास | - | सदस्य |
| सचिव, सामाजिक न्याय | - | सदस्य |
| सचिव, आदिवासी विकास | - | सदस्य |
| सचिव, महिला व बालकल्याण | - | सदस्य |
| सचिव, विधी व न्याय | - | सदस्य |
| महासंचालक, माहिती व जनसंपर्क | - | सदस्य |
| संचालक, सरकारी अभियोग संचालनालय | - | सदस्य |
| सर्व विभागीय आयुक्त | - | सदस्य |
| अति. पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) | - | सदस्य |
| आयुक्त (राज्य गुप्तवार्ता विभाग) | - | सदस्य |
| सर्व परिक्षेत्रांचे विशेष पोलीस महानिरीक्षक | - | सदस्य |
| प्रधान सचिव (विशेष) | - | सदस्य-सचिव |

**(ब) समितीची कार्ये**

(१) मोहिमेच्या अंमलबजावणीचा दरवर्षी आढावा घेऊन आवश्यकतेनुसार शासन निर्णयामध्ये बदल अथवा दुरुस्ती करणे.

(२) राज्य स्तरावर मोहिमेच्या प्रचार व प्रसिद्धीचे नियोजन व अंमलबजावणीतील अडीअडचणींवर देखरेख ठेवून मार्गदर्शन करणे.

(३) मोहिमेच्या मूल्यमापनाचे निकष निश्चित करणे व यथास्थिति बदल करणे.

(४) इतर आनुषंगिक बाबीसंबंधी निर्णय करणे.

**६.२ जिल्हा, तालुका व पोलीस ठाणे स्तरावरील समित्या**

जिल्हा, तालुका व पोलीस ठाणे स्तरावरील समित्या, त्यांची रचना आणि कार्ये **<u>परिशिष्ट-२</u>** प्रमाणे असेल.

**६.३ गाव पातळीवरील समिती**

(अ) राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना एक " तंटामुक्त गाव समिती " स्थापन करणे अनिवार्य राहील. सदर तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षांची व सदस्यांची निवड ग्रामसभा आयोजित करून त्याद्वारे करण्यात येईल.

(१) **समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| ग्रामसभेने निवडलेला प्रतिनिधी | - | अध्यक्ष |
| ग्रामपंचायतीचे सरपंच | - | सदस्य |
| ग्रामपंचायतीचे उपसरपंच | - | सदस्य |

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

| | | |
|---|---|---|
| समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| निर्मल ग्राम योजनेच्या समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ग्राम शिक्षण समितीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| निवृत्त न्यायाधीश | - | सदस्य |
| माजी सैनिकांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| वकिलांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| पदविकाधारक मध्यस्थ (ADR) | - | सदस्य |
| डॉक्टरांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| पत्रकारांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| निवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| व्यापाऱ्यांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| महिला बचत गटांचे प्रतिनिधी | - | २ सदस्य |
| अल्पसंख्याकांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| मागासवर्गीयांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| विद्यार्थी/विद्यार्थिनींचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| नेहरू युवा केंद्राचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| युवकांचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| गावातील महाविद्यालय/माध्यमिक विद्यालय/प्राथमिक शाळा यांमधील अध्यापकाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी | - | सदस्य |
| गावातील इतर प्रभावी व्यक्ती | - | ३ ते ५ सदस्य |
| वीज वितरण कंपनीचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| विशेष पोलीस अधिकारी | - | सदस्य |
| बीट अंमलदार | - | सदस्य |
| ग्राम सुरक्षा दल प्रमुख | - | सदस्य |
| ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी | - | सदस्य |
| गाव कामगार तलाठी | - | सदस्य |
| पोलीस पाटील | - | निमंत्रक |

वरीलपैकी जे ग्रामपंचायत क्षेत्रात असतील तेवढ्याच लोकांची समिती असेल.

(२) समाजात ज्यांचा प्रभाव आहे अशा गावातील प्रतिष्ठित, प्रामाणिक, समजुतदार, सामाजिक प्रश्नांची जाण असलेल्या निःस्पृह, निःस्वार्थी व्यक्तींचा समितीमध्ये समावेश असेल. समितीमध्ये गुंड प्रवृत्तीच्या, कडव्या जातीय विचारसरणीच्या, अवैध धंदे असणाऱ्या वा त्यांचा पुरस्कार करणाऱ्या तसेच असामाजिक तत्वांचा अवलंब करणाऱ्या व्यक्तींना स्थान असणार नाही. समितीचे सदस्य निर्व्यसनी व उत्तम चारित्र्याचे असावेत.

(३) समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे गाव पातळीवरील शासकीय अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना अनिवार्य असेल.

(४) ज्या गावामध्ये तंटामुक्त गाव समितीची स्थापना केली आहे व जी गावे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये सहभागी झालेली आहेत आणि ज्यांना निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोग/राज्य निवडणूक आयोगाकडून आचारसंहिता लागू झाली आहे, अशा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत संबंधित गावाचे सरपंच व उप सरपंच यांच्या बरोबरच तंटामुक्त गाव समितीतील महाविद्यालय/माध्यमिक विद्यालय/ प्राथमिक शाळांमधील अध्यापकांचे प्रतिनिधी, वीज वितरण कंपनी प्रतिनिधी, विशेष पोलीस अधिकारी, बीट अंमलदार, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, तलाठी हे शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थांचे अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस पाटील यांनीसुद्धा मोहिमेच्या कामकाजात भाग घेऊ नये.

**(ब) समितीचे निमंत्रक**

(१) पोलीस पाटील हे सदर समितीचे निमंत्रक असतील. ज्या गावामध्ये पोलीस पाटील हे पद रिक्त असेल अशा ठिकाणी गाव कामगार तलाठी समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील. ज्या ठिकाणी पोलीस पाटील व गाव कामगार तलाठी ही दोन्ही पदे रिक्त असतील अशा ठिकाणी ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी हे समितीचे निमंत्रक म्हणून काम पाहतील.

(२) निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कालावधीसाठी तंटामुक्त गाव समिती आपल्या एका अशासकीय सदस्याची निमंत्रक म्हणून नियुक्ती करेल व अशा नियुक्त सदस्याने या कालावधीत तंटामुक्त गाव समितीचे निमंत्रक म्हणून कामकाज पाहावे.

**(क) समितीचा कार्यकाल व समिती सदस्य व अध्यक्ष बदलणे**

तंटामुक्त गाव समिती कायमस्वरूपी कार्यरत राहील. तथापि जे सदस्य समितीच्या बैठकांना उपस्थित राहत नसतील, समितीच्या कामासाठी वेळ देत नसतील, समितीच्या कामात रस घेत नसतील, समितीच्या कामकाजात अडथळा निर्माण करत असतील अशा सदस्यांना बदलून नवीन सदस्य घेणेबाबत प्रत्येक वर्षाच्या १५ ऑगस्टनंतरच्या पहिल्या ग्रामसभेमध्ये ग्रामसभेच्या मान्यतेने निर्णय घेता येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत तंटामुक्त गाव समितीचे १/३ पेक्षा अधिक सदस्य एकाच वेळी बदलता येणार नाहीत. तसेच समितीचा अध्यक्ष बदलण्याची ग्रामसभेला आवश्यकता वाटत असेल तर अध्यक्ष बदलून नवीन अध्यक्षांची निवड त्याच ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.

**(ड) समितीच्या सदस्यांसाठी आचारसंहिता**

समितीच्या सदस्यांनी निरपेक्ष व निःपक्षपातीपणे काम करणे आवश्यक आहे. सदस्यांनी समितीच्या बैठकांना उपस्थित राहणे, समितीच्या कामासाठी वेळ देणे व तंटे मिटविण्याच्या कामामध्ये रस घेणे आवश्यक आहे. तंटे मिटविताना त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक असला पाहिजे. तंटे मिटवीत असतांना नकारात्मक अथवा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन सदस्यांनी ठेवू नये.

**(इ) समितीची कार्ये व कक्षा**

(१) गावांमध्ये शक्यतोवर तंटे निर्माण होऊ नयेत, जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि अनिष्ट चालीरीती व प्रथांचे निर्मूलन करण्यासाठी गावामध्ये राबवावयाच्या उपरोक्त पुढील परिच्छेद ७.१ मधील व इतर सुयोग्य प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीची रूपरेषा ठरविणे, त्याबाबत जनजागृती करणे व अंमलबजावणी करणे.

(२) प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामसभेला स्पष्ट करून सांगणे.

(३) गावातील लोकांना मोहिमेबद्दल मार्गदर्शन करून सहभागी करून घेणे. तंटे निर्माणच होऊ नयेत म्हणून प्रयत्न करणे. दाखल असलेल्या तंट्यांची यादी करून जास्तीत जास्त प्रयत्न करून ते मिटविणे. नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे.

(४) समिती या कामामध्ये आवश्यकतेनुसार पोलीस अधिकारी, बीट अंमलदार, प्रशासकीय यंत्रणा व कायदेतज्ज्ञ यांचे सहाय्य घेऊ शकेल.

(५) तंटे मिटविताना तंटामुक्त गाव समिती ही मध्यस्थाची व प्रेरकाची भूमिका बजावेल.

**७. मोहिमेची अंमलबजावणी**

या मोहिमेअंतर्गत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :-

**७.१** **प्रतिबंधात्मक उपाययोजना**- तंटे आणि तणाव निर्माण होण्याची प्रमुख कारणे शोधून त्यांचे निर्मूलन होईल यासाठी कार्यवाही करणे, सामाजिक शांती प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने लोकांमध्ये जागृती निर्माण करणे व त्यांचे प्रबोधन करणे तसेच ग्रामसंरक्षण, मालमत्तांचे संरक्षण, सामाजिक सुरक्षितता, इत्यादींसंबंधी विविध उपक्रम हाती घेऊन लोकांमध्ये सुरक्षित व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे. त्यासाठी गावांमध्ये **परिशिष्ट - ३** च्या **अ** येथे विहित केलेल्या विविध विषयांवर लोकसहभागातून कार्यक्रम घेऊन ते प्रभावीपणे राबविण्यात यावेत.

मोहीम कालावधीत करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची नोंद या शासन निर्णयासोबतच्या नमुन्यातील **नोंदवही-१** मध्ये योग्य पद्धतीने करण्यात यावी. समितीचे अध्यक्ष व निमंत्रक यांच्या स्वाक्षरीने नोंदवही मूल्यमापन परिक्षणाच्यावेळी सादर केली जावी.

**७.२ दाखल असलेले तंटे मिटविणे.**

१) तंट्यांची माहिती संकलीत करणे.

(अ) ज्या गावांनी तंटामुक्त गाव मोहिमेत सहभाग घेतलेला नाही किंवा ज्यांनी ग्रामसभा घेऊन तंटामुक्त गाव समिती स्थापन केली आहे परंतु तंट्यांची माहिती संकलीत करून तंटे मिटविण्याची कार्यवाही सुरू केली नाही अशा गावांमधील तंटामुक्त गाव समिती दाखल असलेल्या दिवाणी, महसुली, फौजदारी व इतर तंट्यांची माहिती ३० सप्टेंबरपर्यन्त जमा करेल. त्यासाठी तंटे/ वाद याची माहिती तंटामुक्त गाव समितीकडे देण्यासाठी समिती ग्रामस्थांना आवाहन करेल. तसेच समितीस सुयोग्य वाटेल अशा पद्धतीने व आवश्यकतेनुसार घरोघरी जाऊन माहिती जमा करेल. पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, न्यायालय, इत्यादी कार्यालयातून समिती माहिती मिळवेल. अशा सर्व प्राप्त माहितीचा मेळ घालून गावातील तंट्यांची यादी करेल.

(ब) जी गावे मोहिमेत सहभागी झाली आहेत तथापि, ती पुरस्कारासाठी पात्र ठरली नाहीत अशा गावांच्या बाबतीत ३० सप्टेंबर २००७ पर्यंत नोंदविलेल्या दाखल तंट्यात त्या पुढील वर्षाच्या ३० सप्टेंबर पर्यंतचे तंटे समाविष्ट करून ते दाखल तंटे म्हणून परिगणीत करण्यात येतील.

२) संकलीत केलेल्या माहितीतील तंट्यांचे वर्गीकरण करणे.

(अ) संकलीत केलेल्या माहितीतील तंट्यांचे दिवाणी, महसुली, फौजदारी व इतर तंटे यामध्ये वर्गीकरण करावे.

(ब) फौजदारी तंट्यांचे वर्गीकरण अदखलपात्र आणि दखलपात्र असे करावे. यासाठी आवश्यकतेनुसार बीट अंमलदार यांची मदत घ्यावी.

(क) दखलपात्र फौजदारी तंट्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करावे:-

(१) दखलपात्र मिटविता येण्यासारखे (कंपाऊंडेबल):- फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३२० मध्ये नमूद केलेले सर्व गुन्हे या प्रकारामध्ये समाविष्ट करावेत.

(२) दखलपात्र न मिटविता येणारे (नॉन-कंपाऊंडेबल):- फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३२० मध्ये नमूद केलेल्या गुन्ह्यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व तंटे/गुन्हे या प्रकारामध्ये समाविष्ट करावेत.

३) तंटे/गुन्हे यांची वर्गीकरणानुसार नोंदी करणे.

तंटे/गुन्हे यांचे वर्गीकरण केल्यानंतर दिवाणी, महसुली, अदखलपात्र फौजदारी; मिटविता येण्यासारखे दखलपात्र फौजदारी (कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हे यांची नोंद **नोंदवही-२(अ)** मध्ये करावी. मात्र मिटविता न येणारे दखलपात्र फौजदारी (नॉन कंपाऊंडेबल) तंटे/गुन्ह्यांची नोंद **नोंदवही -२(ब)** मध्ये केवळ माहितीसाठी करण्यात यावी.

४) तंटे मिटविणे.

(अ) **नोंदवही-२(अ)** मधील दिवाणी, महसुली, अदखलपात्र फौजदारी व मिटविता येण्यासारखे दखलपात्र (कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हे समितीने मिटविण्याचा प्रयत्न करावा. मात्र **नोंदवही-२(ब)** मध्ये नोंदविलेले कायद्याप्रमाणे मिटविता न येण्यासारखे दखलपात्र फौजदारी (नॉन कंपाऊंडेबल) तंटे/गुन्हे समितीस मिटविता येणार नाहीत.

(ब) पति-पत्नीमधील विविदाची प्रकरणे, पोटगी, वाढीव पोटगीची प्रकरणे या संदर्भातील तंटे मिटवित असताना प्रतिवादी ज्या गावाच्या क्षेत्रातील रहिवासी आहे त्या गावाच्या तंटामुक्त गाव समितीने असे तंटे मिटविण्यासाठी विचारात घ्यावेत. अशा तंट्यातील वादी ज्या गावाचे रहिवासी आहे त्या गावाच्या तंटामुक्त गाव समितीने तंटे तडजोडीने मिटविण्यासाठी दुसऱ्या गावातील तंटामुक्त गाव समितीस संपूर्ण सहकार्य करावे.

(क) मालमत्तेसंदर्भातील वादाच्या प्रकरणांमध्ये पक्षकार एकापेक्षा अधिक गावातील रहिवासी असल्यास वादातील मालमत्ता ज्या गावाच्या हद्दीमध्ये आहे त्या गावाच्या तंटामुक्त गाव समितीने अशा मालमत्तेबाबतचा तंटा तडजोडीने मिटविण्याबाबत कार्यवाही करावी.

(ड) शासनाने /सार्वजनिक प्राधिकरणाने किंवा संस्थेने एखाद्या व्यक्तीच्या विरुद्ध दावा दाखल केला असेल, अथवा एखाद्या व्यक्तीने शासनाविरुद्ध /सार्वजनिक प्राधिकरणाविरुद्ध /संस्थेविरुद्ध दावा दाखल केला असेल तर, असे दावे तडजोडीने मिटविण्यासाठी तंटामुक्त गाव समितीने विचारात घेऊ नयेत. अशा प्रकारचे दावे या मोहिमेतून वगळण्यात येत आहेत.

५) तंटे मिटविण्याची कार्यपद्धती

(अ) समितीने उभय पक्षकारांना बोलावून आणि त्यांची बाजू ऐकून घेऊन तंटे मिटविण्याचा प्रयत्न करावा. आवश्यक तेथे महसूल किंवा अन्य विभागाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व मदत घेण्यात यावी. त्याचबरोबर फौजदारी तंट्यांच्या बाबतीत आवश्कतेनुसार पोलीस ठाणे प्रमुख व बीट अंमलदार यांचे मार्गदर्शन व सहाय्य घेऊन तंटे मिटविण्याचे प्रयत्न करावेत.

(ब) तंटे मिटविण्यासाठी महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधी सेवा समिती व तालुका विधी सेवा समिती यांचे सहाय्य घेण्यात यावे.

(क) तंटामुक्त गाव समितीने आवश्यक तेथे मोफत कायदे सल्लागार समितीचा अथवा तज्ज्ञ वकीलांचा सल्ला घ्यावा. तसेच पक्षकारांना त्यांच्या तंट्यांतील कायद्याच्या बाजू स्पष्ट करून सांगण्यासाठीही आवश्यकतेनुसार त्यांची मदत घ्यावी.

(ड) एकमेकांमध्ये तेढ वाढू न देता तंटे मिटविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

(इ) तंटा/वाद मिटल्यानंतर संबंधित पक्षकारांमध्ये लेखी तडजोडनामा तयार करून तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष आणि निमंत्रक यांच्या समक्ष पक्षकारांच्या त्यावर स्वाक्षरी घेण्यात याव्यात. तसेच अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर "समोर" म्हणून स्वाक्षरी करावी.

६) दिवाणी, महसुली व इतर न्यायालयात प्रलंबित दावे मिटविण्यासंबंधी खालील प्रमाणे कार्यपद्धती अवलंबण्यात यावी :-

(अ) दिवाणी, महसुली व इतर न्यायालयात प्रलंबित दाव्यासंबंधी तडजोड झाल्यानंतर उभय पक्षकारांच्या स्वाक्षरीने न्यायालयामध्ये वा सक्षम प्राधिकाऱ्याकडे पक्षकारांनी स्वतः अथवा त्यांच्या वकीलांमार्फत तडजोडनामा दाखल करून त्यावर न्यायालयाचे वा सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश प्राप्त करून घ्यावेत. अशा आदेशांची सत्य प्रत प्राप्त झाल्यानंतर न्यायालयामध्ये प्रलंबित असलेले दावे मिटले असे समजण्यात येईल आणि त्यानंतर तशी नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

(ब) त्याचबरोबर विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या प्रकरण ६ कलम १९ अन्वये स्थापन केलेल्या लोक न्यायालयाकडे अर्ज करून तडजोडनामा दाखल करावा आणि लोक न्यायालयाकडून हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करून घेण्याचीही पद्धती तंटे मिटविण्यासाठी अवलंबण्यात यावी. लोक न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त झाल्यानंतर त्याची सत्यप्रत अभिलेखांवर घेऊन त्याद्वारे तंटा मिटला असे समजण्यात यावे.

**विधी सेवा प्राधिकरण कायदा कलम १९(५) प्रमाणे लोकन्यायालयामध्ये,**

(i) **कोणत्याही न्यायालयामध्ये प्रलंबित असलेला दावा आणि,**

(ii) **कोणत्याही न्यायालयात दाखल नसलेले प्रकरण तडजोडीने मिटविता येते.**

७) अदखलपात्र व दखलपात्र फौजदारी तंटे/गुन्हे मिटविण्यासंबंधी खालील प्रकारे कार्यपद्धती अवलंबण्यात यावी:-

(१) अदखलपात्र तंट्यांच्या बाबतीत उभय पक्षकारांच्यामध्ये तंटा मिटल्याचा लेखी तडजोडनामा करून त्यावर तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष व निमंत्रक यांच्यासमोर पक्षकारांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे

अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर "समोर" म्हणून स्वाक्षरी करावी.

(२) दखलपात्र गुन्ह्यांच्या बाबतीत पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झालेली आहे परंतु न्यायालयात दोषारोपपत्र पाठविलेले नाही अशा तंट्यांमध्ये उभय पक्षकारांनी तडजोडनामा तयार करावा. फिर्यादीने तडजोडनाम्याची एक प्रत जोडून पोलीस ठाण्याकडे लेखी अर्ज करून फिर्याद मागे घेत असल्याचे कळवावे. पोलीस ठाण्याच्या अधिका-यांनी या तंट्यांसंबंधी उचित समरी मिळावी म्हणून संबंधित न्यायालयाकडे प्रस्ताव पाठवावा. न्यायालयाने समरी स्वीकारल्याचा आदेश निर्गमित केल्यानंतर तंटामुक्त गाव समितीने आदेशाची सत्य प्रत प्राप्त करून घेऊन दप्तरी ठेऊन घ्यावी आणि त्यानंतर तंटा मिटल्याची नोंद नोंदवहीमध्ये करावी.

(३) दखलपात्र गुन्ह्यांसंबंधी न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल झालेल्या तंट्यांच्या बाबतीत फिर्यादी व आरोपी यांनी न्यायालयासमोर वाद मिटल्याची लेखी पुरसीस (अर्ज) दाखल करावी. न्यायालयाने फौजदारी तंटा मिटल्यासंबंधी दिलेल्या आदेशाची सत्य प्रत प्राप्त करून घेऊन तंटामुक्त गाव समितीने दप्तरी ठेवून घ्यावी व तंटा मिटल्याची नोंद संबंधित नोंदवहीत करावी.

(४) वरील तंटा मिटविण्याच्या पद्धतीबरोबरच विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या प्रकरण ६ कलम १९ अन्वये स्थापन केलेल्या लोक न्यायालयाकडे अर्ज करून तडजोडनामा दाखल करावा व लोक न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करून घेण्याचीही पद्धती तंटे मिटविण्यासाठी अवलंबण्यात यावी. लोक न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त झाल्यानंतर त्याची सत्यप्रत अभिलेखांवर घेऊन त्याद्वारे तंटा मिटला असे समजण्यात यावे.

(५) कोणत्याही न्यायालयात दाखल केली नसलेली अथवा प्रलंबित नसलेली प्रकरणेही, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीने तडजोडीने मिटविल्यानंतर लोक न्यायालयांकडे अर्ज करून हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करून घ्यावेत.

(६) न्यायालयात प्रलंबित दाव्यासंबंधी तडजोड करण्याकरिता वरीलप्रमाणे दोन कार्यपद्धती विहित करण्यात आलेल्या आहेत. यापैकी कोणत्याही सोयीस्कर अशा कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा. सुलभ संदर्भाच्या दृष्टीने लोक न्यायालयाविषयी कायद्यातील संक्षिप्तात तरतुदी आणि प्रशासन व महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीने करावयाची कार्यवाही यासंबंधीची माहिती सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये आणि अर्जाचे व तडजोडनाम्याचे नमुने परिशिष्ट-५ मध्ये देण्यात आले आहेत.

(७) उपरोक्त विहित केलेल्या पद्धतीचा वापर करून न्यायालयातील अपिल प्रकरणेसुद्धा निकाली काढता येतील.

(ब) तंटे मिटविण्यासाठी महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधी सेवा समिती व तालुका विधी सेवा समिती यांचे सहाय्य घेण्यात यावे.

(क) तंटामुक्त गाव समितीने आवश्यक तेथे मोफत कायदे सल्लागार समितीचा अथवा तज्ज्ञ वकीलांचा सल्ला घ्यावा. तसेच पक्षकारांना त्यांच्या तंट्यांतील कायद्याच्या बाजू स्पष्ट करून सांगण्यासाठीही आवश्यकतेनुसार त्यांची मदत घ्यावी.

(ड) एकमेकांमध्ये तेढ वाढू न देता तंटे मिटविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

(इ) तंटा/वाद मिटल्यानंतर संबंधित पक्षकारांमध्ये लेखी तडजोडनामा तयार करून तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष आणि निमंत्रक यांच्या समक्ष पक्षकारांच्या त्यावर स्वाक्षरी घेण्यात याव्यात. तसेच अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर "समोर" म्हणून स्वाक्षरी करावी.

६) दिवाणी, महसुली व इतर न्यायालयात प्रलंबित दावे मिटविण्यासंबंधी खालील प्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी :-

(अ) दिवाणी, महसुली व इतर न्यायालयात प्रलंबित दाव्यासंबंधी तडजोड झाल्यानंतर उभय पक्षकारांच्या स्वाक्षरीने न्यायालयामध्ये वा सक्षम प्राधिकाऱ्याकडे पक्षकारांनी स्वतः अथवा त्यांच्या वकीलांमार्फत तडजोडनामा दाखल करून त्यावर न्यायालयाचे वा सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश प्राप्त करून घ्यावेत. अशा आदेशांची सत्य प्रत प्राप्त झाल्यानंतर न्यायालयामध्ये प्रलंबित असलेले दावे मिटले असे समजण्यात येईल आणि त्यानंतर तशी नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

(ब) त्याचबरोबर विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या प्रकरण ६ कलम १९ अन्वये स्थापन केलेल्या लोक न्यायालयाकडे अर्ज करून तडजोडनामा दाखल करावा आणि लोक न्यायालयाकडून हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करून घेण्याचीही पद्धती तंटे मिटविण्यासाठी अवलंबण्यात यावी. लोक न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त झाल्यानंतर त्याची सत्यप्रत अभिलेखांवर घेऊन त्याद्वारे तंटा मिटला असे समजण्यात यावे.

**विधी सेवा प्राधिकरण कायदा कलम १९(५) प्रमाणे लोकन्यायालयामध्ये,**

(i) **कोणत्याही न्यायालयामध्ये प्रलंबित असलेला दावा आणि,**

(ii) **कोणत्याही न्यायालयात दाखल नसलेले प्रकरण तडजोडीने मिटविता येते.**

७) अदखलपात्र व दखलपात्र फौजदारी तंटे/गुन्हे मिटविण्यासंबंधी खालील प्रकारे कार्यपद्धती अवलंबण्यात यावी:-

(१) अदखलपात्र तंट्यांच्या बाबतीत उभय पक्षकारांच्यामध्ये तंटा मिटल्याचा लेखी तडजोडनामा करून त्यावर तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष व निमंत्रक यांच्यासमोर पक्षकारांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे

अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर "समोर" म्हणून स्वाक्षरी करावी.

(२) दखलपात्र गुन्ह्यांच्या बाबतीत पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झालेली आहे परंतु न्यायालयात दोषारोपपत्र पाठविलेले नाही अशा तंट्यांमध्ये उभय पक्षकारांनी तडजोडनामा तयार करावा. फिर्यादीने तडजोडनाम्याची एक प्रत जोडून पोलीस ठाण्याकडे लेखी अर्ज करून फिर्याद मागे घेत असल्याचे कळवावे. पोलीस ठाण्याच्या अधिका-यांनी या तंट्यांसंबंधी उचित समरी मिळावी म्हणून संबंधित न्यायालयाकडे प्रस्ताव पाठवावा. न्यायालयाने समरी स्वीकारल्याचा आदेश निर्गमित केल्यानंतर तंटामुक्त गाव समितीने आदेशाची सत्य प्रत प्राप्त करून घेऊन दप्तरी ठेऊन घ्यावी आणि त्यानंतर तंटा मिटल्याची नोंद नोंदवहीमध्ये करावी.

(३) दखलपात्र गुन्ह्यांसंबंधी न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल झालेल्या तंट्यांच्या बाबतीत फिर्यादी व आरोपी यांनी न्यायालयासमोर वाद मिटल्याची लेखी पुरसीस (अर्ज) दाखल करावी. न्यायालयाने फौजदारी तंटा मिटल्यासंबंधी दिलेल्या आदेशाची सत्य प्रत प्राप्त करून घेऊन तंटामुक्त गाव समितीने दप्तरी ठेवून घ्यावी व तंटा मिटल्याची नोंद संबंधित नोंदवहीत करावी.

(४) वरील तंटा मिटविण्याच्या पद्धतीबरोबरच विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या प्रकरण ६ कलम १९ अन्वये स्थापन केलेल्या लोक न्यायालयाकडे अर्ज करून तडजोडनामा दाखल करावा व लोक न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करून घेण्याचीही पद्धती तंटे मिटविण्यासाठी अवलंबण्यात यावी. लोक न्यायालयाचा हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त झाल्यानंतर त्याची सत्यप्रत अभिलेखांवर घेऊन त्याद्वारे तंटा मिटला असे समजण्यात यावे.

(५) कोणत्याही न्यायालयात दाखल केली नसलेली अथवा प्रलंबित नसलेली प्रकरणेही, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीने तडजोडीने मिटविल्यानंतर लोक न्यायालयाकडे अर्ज करून हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करून घ्यावेत.

(६) न्यायालयात प्रलंबित दाव्यासंबंधी तडजोड करण्याकरिता वरीलप्रमाणे दोन कार्यपद्धती विहित करण्यात आलेल्या आहेत. यापैकी कोणत्याही सोयीस्कर अशा कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा. सुलभ संदर्भाच्या दृष्टीने लोक न्यायालयाविषयी कायद्यातील संक्षिप्तात तरतुदी आणि प्रशासन व महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीने करावयाची कार्यवाही यासंबंधीची माहिती सोबतच्या परिशिष्ट-४ मध्ये आणि अर्जाचे व तडजोडनाम्याचे नमुने परिशिष्ट-५ मध्ये देण्यात आले आहेत.

(७) उपरोक्त विहित केलेल्या पद्धतीचा वापर करून न्यायालयातील अपिल प्रकरणेसुद्धा निकाली काढता येतील.

(८) लोक न्यायालयाचे आयोजन.-

सदर शासन निर्णयाच्या सोबतच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केल्यानुसार पोलीस ठाणे स्तरावरील समितीने त्यांचे कार्यक्षेत्रासाठी लोकन्यायालये व महसूल न्यायालये आयोजित करून अवघड दावे मिटविण्यास मदत करणे असे विहित केलेले आहे. त्याप्रमाणेच संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण/ तालुका विधी सेवा समिती यांना विनंती करून लोक न्यायालये आयोजित करण्याकरिता आवश्यक ती सर्व कार्यवाही करून तंटे मिटविण्यामध्ये पुढाकार घेऊन मोहिम प्रभावीपणे राबविण्यात यावी.

(९) मिटलेल्या तंट्यांची नोंद.-

मिटलेल्या सर्व तंट्यांची नोंद **नोंदवही २ (अ)** मध्ये घेण्यात यावी.

### ७.३ नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविणे

१) प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यानंतरही काही तंटे निर्माण होण्याची शक्यता असल्याने गावांमध्ये दरवर्षी ३० सप्टेंबरनंतर मोहिम कालावधीत नव्याने निर्माण झालेले तंटे समिती मिटवेल.

२) नव्याने निर्माण झालेल्या तंट्यांचे वर्गीकरण वरील परिच्छेद ७.२.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करावे व तंट्यांची नोंद त्यांच्या प्रकारानुसार **नोंदवही -३ (अ) व नोंदवही ३ (ब)** मध्ये घेण्यात यावी.

३) गावामध्ये एखादा तंटा निर्माण झाल्यास शक्यतोवर तंटा घडलेल्या ठिकाणाजवळ राहणाऱ्या तंटामुक्त गाव समितीच्या सदस्यांशी अथवा समितीच्या इतर सदस्यांशी संपर्क साधण्यात यावा. संबंधित सदस्याने सदर प्रकरणामध्ये हस्तक्षेप करावा व तंटा मिटविण्याचा प्रयत्न करावा. तसेच आवश्यकतेनुसार समितीच्या अध्यक्षांशी संपर्क साधावा व समितीमार्फत उभय पक्षकारांमध्ये समझोता करण्याचा प्रयत्न करावा.

४) नवीन निर्माण झालेले तंटेसुद्धा वरील परिच्छेद ७.२.५ मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार मिटविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

५) गावात एखादा तंटा घडला असेल व तो कोणत्याच माध्यमातून समितीसमोर आला नसेल तर समितीने अशा तंट्यांचे बाबतीत ऐकीव माहितीवर अपरोक्षरित्या वस्तुस्थिती जाणून घ्यावी व तथ्य असल्यास तो तंटा मिटविण्यासाठी विचारात घ्यावा.

६) मिटलेल्या तंट्यांच्या नोंदी **नोंदवही ३ (अ)** मध्ये घेण्यात यावी.

### ७.४ परस्पर पोलीस ठाण्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जावरील कार्यवाही

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या कालावधीमध्ये जर काही लोकांचे अर्ज परस्पर पोलीस ठाण्याकडे प्राप्त झाले तर पोलीस ठाणे प्रमुखाने सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार त्याची दखल घेऊन चौकशी व कारवाई करावी. मात्र असा अर्ज प्राप्त होताच त्या अर्जातील या मोहिमेमध्ये मिटविता येणाऱ्या तंटे/गुन्ह्यांमध्ये जे तंटे/गुन्हे मोडतात, अशा संबंधीच्या अर्जाची एक प्रत तंटामुक्त गाव समितीस पाठवावी. तंटामुक्त गाव समितीने अशा प्राप्त अर्जांची दखल घेऊन तक्रार मिटविण्याचा समांतर प्रयत्न करावा. सदर अर्जातील तंटा मिटल्यास समितीने त्याची नोंद **नोंदवही ३(अ)** मध्ये करावी आणि पोलीस स्टेशन स्तरावर तडजोडनाम्याच्या आधारावर प्रकरण निकाली काढावे.

## ८. मोहिमेचे अभिलेख

प्रतिबंधात्मक उपाययोजनांची नोंदवही ठेवणे, तंट्यांसंबंधी माहिती संकलित करणे, नोंद घेणे, त्याचे वर्गीकरण करणे, इत्यादी सर्व कामे समितीचे निमंत्रक करतील असे अभिलेख समितीचे निमंत्रक व अध्यक्षांनी स्वाक्षरीत करावेत.

## ९. मोहीमेचा प्रारंभ

मोहिमेचा प्रारंभ दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी होईल.

## १०. मोहीम कार्यान्वयन

### १०.१ कार्यान्वयन

अ) दरवर्षी १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत मोहिमेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करावी आणि ग्रामसभेने महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत भाग घेण्याचा निर्णय करावा. मोहिमेत भाग घेऊ इच्छित असल्याबाबतचे पत्र व तंटामुक्त गाव समिती सदस्यांची यादी संबंधित पोलीस ठाणे प्रमुखास ग्रामपंचायतीने तात्काळ पाठवावी.

ब) दिनांक १ सप्टेंबर रोजी संबंधित पोलीस ठाणे प्रमुख त्या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मोहिमेत भाग घेणाऱ्या गावांची यादी व तंटामुक्त गाव समितीच्या सदस्यांची यादी जाहीर करतील व गावांची यादी तहसीलदार यांना पाठवतील.

क ) संबंधित तालुक्याचे तहसीलदार तालुक्यातील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत भाग घेणाऱ्या गावांची यादी तालुकास्तरावरुन जाहीर करतील.

ड) पोलीस ठाण्याचे प्रमुख तंटामुक्त गाव समितीच्या जाहीर यादीची प्रत ग्रामपंचायतीस पाठवितील. ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी अशी यादी ग्राम पंचायतीमध्ये लावतील.

### १०.२ मार्गदर्शन व प्रोत्साहन

अ) जिल्ह्यातील पोलीस व महसूल अधिकारी महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील. त्यांच्या कार्यक्षेत्रातील दौऱ्याच्या वेळी गावांना भेटी देऊन गावातील मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेतील. ग्रामपंचायतीला व तंटामुक्त गाव समितीला या मोहिमेसंबंधी येणाऱ्या अडचणी जाणून घेतील. त्यांच्या अडचणींचे निराकरण करून आणि मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहन देतील.

ब) तालुक्यातील तहसीलदार व पोलीस ठाणे प्रमुख हे त्यांच्या क्षेत्रामधील दौऱ्याच्या वेळी मोहिमेत सहभागी गावांना भेटी देऊन तंटामुक्त गाव समितीला मार्गदर्शन करतील. त्यांच्या अडचणी सोडविण्यात व तंटे सोडविण्यामध्ये सहकार्य करतील.

क) त्याचप्रमाणे तहसीलदार व पोलीस ठाणे प्रमुख हे संयुक्तपणे दौरे करून मोहिमेमध्ये सहभागी गावांना भेटी देऊन मार्गदर्शन करून प्रोत्साहन देतील.

### १०.३ तंटा निवारण कक्ष

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय व गृह विभागात उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून स्थापित **"तंटामुक्त गाव मोहिम कक्ष"** संपूर्ण मोहिम वर्षांमध्ये कार्यान्वित राहील.

### १०.४ तंटामुक्त गाव अहवाल

अ) गाव तंटामुक्त झाल्याचा अहवाल तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष व निमंत्रक त्यांच्या स्वाक्षरीने पोलीस ठाणे प्रमुख व तहसीलदार यांचेकडे पाठवतील.

ब) पोलीस ठाण्याचे प्रमुख व तहसीलदार यांच्या संयुक्त स्वाक्षरीने तहसीलदार तंटामुक्त गावांची यादी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना पाठवितील व त्याची एक प्रत उप विभागीय दंडाधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकारी यांना देतील.

क) जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे संयुक्त स्वाक्षरीने जिल्ह्यातील तंटामुक्त गावांची यादी शासन, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना पाठवतील.

## ११. मूल्यमापनाचे निकष

१) मोहिमेमध्ये भाग घेतलेल्या गावांनी मोहिमेंतर्गत केलेल्या कामांचे मूल्यमापन करण्यासाठी २०० गुण ठेवण्यात येतील. सदर गुणांची विभागणी व पात्रतेसाठी किमान गुण पुढीलप्रमाणे असतील:-

| तंटे निवारण | | प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे | दाखल तंटे मिटविणे (३० सप्टेंबरपर्यंतचे) | नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे (३० सप्टेंबर ते ३० एप्रिल) |
|---|---|---|---|---|
| एकूण गुण | २०० | ८० | १०० | २० |
| किमान आवश्यक गुण | | ५६ | ७० | १४ |

२) तंटामुक्त गाव जाहीर करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, दाखल तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे यासाठी अनुक्रमे ५६, ७० व १४ किमान गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर किमान आवश्यक गुणांची बेरीज १४० येत असली तरी तंटामुक्त पात्रतेसाठी एकत्रित १५० गुण मिळविणे आवश्यक राहील. एखाद्या गावात दाखल तंटेच नसतील किंवा नव्याने तंटे निर्माण झालेच नाहीत तर त्या तंट्यांच्या प्रकारातले पात्रतेसाठी आवश्यक किमान गुण त्यांना दिले जातील.

३) एकूण २०० गुणांपैकी किमान १५० गुण प्राप्त करणारे गाव तंटामुक्त गाव समजण्यात येईल.

४) गुणांबाबतचा सविस्तर तपशील आणि गुणप्रदानासंबंधी उदाहरण **परिशिष्ट ३** मध्ये दिलेले आहे.

## १२. मूल्यमापन समित्या व त्यांचे कामकाज

### १२.१ जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन करणे

१) मोहिमेमध्ये भाग घेतलेल्या गावांचे मूल्यमापन करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय कार्यकारी समिती प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र जिल्हा मूल्यमापन समिती दरवर्षी दि. १५ एप्रिलपूर्वी स्थापन करील.

२) जिल्हा मूल्यमापन समिती पाच सदस्यांची असेल आणि त्यामध्ये महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी, विधी अधिकारी/विधी सल्लागार; एका पंचायत समितीचे सभापती व जिल्हा पत्रकार संघाने शिफारस केलेल्या एका प्रतिनिधीचा समावेश असेल. महसूल अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील.

३) सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यासाठी एक मूल्यमापन समिती स्थापन करण्यात येईल. तथापि, जिल्ह्यातील तंटामुक्त घोषित गावांची संख्या विचारांत घेऊन जास्त जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन करता येतील. तालुक्यातील घोषित गावांची संख्या विचारात घेऊन एका जिल्हा मूल्यमापन समितीला एकापेक्षा अधिक तालुक्यांतील गावांच्या मूल्यमापनाचे काम देता येईल. एखाद्या तालुक्यात घोषित गावांची संख्या जास्त असेल, तर एकापेक्षा अधिक समित्या अशा तालुक्यांसाठी नेमता येतील, मात्र अशा समित्यांना गावे विभागून देण्यात येतील.

४) अतिरिक्त जिल्हा समितीत पंचायत समितीचे सभापती व विधी अधिकारी यांचा समोवश असल्याने अतिरिक्त समित्यात पंचायत समितीव्यतिरिक्त जिल्हा परिषदेच्या अन्य सभापतींचा व सहायक सरकारी अभियोक्त्यांची जिल्ह्यातील कार्यरत संख्या कमी असेल, तर त्यांच्या जागी विधी व न्याय विभागाने नियुक्त केलेल्या सरकारी वकीलांच्या पॅनल मधील वकीलांचा आवश्यकतेनुसार समावेश करण्यात येईल.

५) संबंधित सभापती व सरकारी वकलींच्या पॅनल वरील वकील ज्या तालुक्यातील आहेत त्या तालुक्याव्यतिरिक्त अन्य तालुक्यांसाठी असलेल्या समितीत त्यांचा समावेश करण्यात येईल.

६) जिल्हा बाह्यमूल्यमापनासाठी मूल्यमापन समित्या पाठविताना जो जिल्हा बाह्यमूल्यमापनासाठी दिला असेल त्या जिल्ह्यातील तंटामुक्त गावांची संख्या विचारात घेऊन किती जिल्हा मूल्यमापन समित्या त्या जिल्ह्याला पाठवावयाच्या ते जिल्हा कार्यकारी समिती वरील (३) मधील सूचना विचारात घेऊन ठरवील.

**१२.२ मूल्यमापनासाठी विचारात घ्यायची गावे**

१ मे रोजी ज्या गावांनी ग्रामसभा घेऊन गाव तंटामुक्त झाल्याचे घोषित केले असेल आणि अध्यक्ष व निमंत्रक यांच्या स्वाक्षरीने स्वयंमूल्यमापन अहवाल पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्याकडे २ मे पूर्वी पाठविला असेल, अशा गावांचे मूल्यमापन करण्यात येईल.

**१२.३ जिल्हा मूल्यमापन समित्यांना तालुक्यांचे वाटप आणि प्रशिक्षण**

तंटामुक्त गावांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी कोणती जिल्हा मूल्यमापन समिती असेल याची यादी दरवर्षी दिनांक ०५ मे पूर्वी जिल्हास्तरीय कार्यकारी समिती जाहीर करील. जिल्हा मूल्यमापन समितीमधील सदस्य ज्या तालुक्यातील असतील ते तालुके अशा समितीला देण्यात येणार नाहीत. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे मूल्यमापान समितीतील सर्व सदस्यांचे ३० एप्रिल पूर्वी प्रशिक्षण घेऊन त्यांना त्यांच्या कामाबद्दल अवगत करतील.

**१२.४ मूल्यमापन कार्यक्रम**

तंटामुक्त गावांच्या मूल्यमापनाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा मूल्यमापन समित्यांची स्थापना | : | १५ एप्रिल पूर्वी |
| २) | मूल्यमापनाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण | : | ३० एप्रिल पूर्वी |
| ३) | जिल्हा मूल्यमापन समित्यांना तालुक्यांचे वाटप | : | ०५ मे पूर्वी |
| ४) | जिल्हा मूल्यमापन समित्यांनी तंटामुक्त गावाचे जिल्हाअंतर्गत मूल्यमापन करणे व अहवाल पोलीस अधीक्षक यांना सादर करणे | : | ०५ मे ते ०५ जून |
| ५) | जिल्हास्तरीय कार्यकारी समित्यांनी जिल्हा मूल्यमापन अहवाल आणि जिल्हा बाह्य मूल्यमापनासाठी त्यांच्या जिल्ह्यातील मूल्यामापन समित्यांचा तपशील शासनास सादर करणे | : | १० जून पूर्वी |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | जिल्हा बाह्य मूल्यमापनासाठी शासनाने जिल्ह्यांचे वाटप करणे. | : | १५ जून पूर्वी |
| ७) | जिल्हा बाह्य मूल्यमापनाचा कालावधी | : | २० जून ते २० जुलै |
| ८) | जिल्हा बाह्य मूल्यामापन समित्यांनी पोलीस अधीक्षकांना अहवाल सादर करणे. | : | २० जुलै पूर्वी |
| ९) | जिल्हा बाह्य मूल्यमापन समित्यांनी सादर केलेले जिल्हा बाह्य मूल्यमापनाचे अहवाल जिल्हा कार्यकारी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करणे. | : | २५ जुलै पूर्वी |
| १०) | शासनस्तरावरून तंटामुक्त गावाची घोषणा करणे | : | ०९ ऑगस्ट |

**१२.५ मूल्यमापन कार्यक्रम संबंधित गावांना कळविणे**

जिल्हा मूल्यमापन समित्या त्यांना नेमून दिलेल्या तालुक्यातील गावांचा तपासणीचा कार्यक्रम ठरवतील व त्याबाबत संबंधित गावांना आगाऊ कळवतील.

**१२.६ जिल्हा मूल्यमापन समितीस तंटामुक्त गाव समितीने उपलब्ध करावयाची माहिती**

१) तंटामुक्त गाव समितीच्या सदस्यांची यादी.

२) नोंदवह्या : नोंदवही क्र.१, नोंदवही क्र.२अ आणि २ब व नोंदवही क्र. ३अ आणि ३ब.

३) तंटामुक्त गाव समिती सोबतच्या **परिशिष्ट - ६** मधील प्रपत्र- "१", "२" व "३" मध्ये स्वयंमूल्यमापन अहवाल तयार करून सादर करेल. स्वयंमूल्यमापन अहवाल तयार करताना मिटविलेल्या तंट्यांसंबधी तंटामुक्त गाव समितीने न्यायालयात, लोकन्यायालयात, सक्षम प्राधिकारी यांचेकडे तडजोडनाम्याप्रमाणे आदेशासाठी अर्ज केला असेल तर त्या तंट्यासाठी पूर्ण गुण देण्यात येतील. मात्र अशा तंट्यांच्या बाबतीत जिल्हाबाह्य मूल्यमापनापूर्वी न्यायालयाचे, लोकन्यायालयाचे, संबंधित सक्षम प्राधिका-याचे आदेश मिळविणे आवश्यक राहील.

४) गावात राबविलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची मूल्यमापनासाठी माहिती-

(अ) प्रतिबंधात्मक उपाययोजना संबंधी केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती खालील प्रपत्रात तयार करण्यात येईल.

| अ.क्र. | प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे उपशीर्ष | राबविलेल्या उपाययोजनांचे उपशीर्ष | राबविलेल्या उपक्रमांची माहिती | सहभागी व्यक्ती | राबविलेल्या उपक्रमामुळे गावात झालेले परिणाम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

(ब) वरील प्रपत्रात दिलेल्या मुद्यांशिवाय इतर माहिती द्यावयची असल्यास, तंटामुक्त गाव समिती त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीने पूरक माहिती जिल्हा मूल्यमापन समितीस सादर करील.

५) प्रत्येक मिटविलेल्या तंट्याची खालील कागदपत्रांचा समावेश असलेली परिक्षणासाठी वैयक्तिक नस्ती (फाईल्स).

(क) तंट्यांसंबंधी न्यायालयात वा संबंधित प्राधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेल्या दाव्यांची प्रत अथवा यादी.

(ख) तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष, निमंत्रक व पक्षकार यांच्या स्वाक्षरी असलेली तडजोडनाम्याची प्रत.

(ग) संबंधित न्यायालयाकडे, सक्षम प्राधिकाऱ्याकडे तडजोडनाम्याप्रमाणे आदेश होण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत आणि पोच किंवा विधी सेवा समितीकडे लोकन्यायालयामधून तडजोडीप्रमाणे आदेश होण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत आणि पोच.

(घ) संबंधित न्यायालयाने, लोकन्यायालयाने, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाची/हुकूमनाम्याची प्रत.

(च) नव्याने निर्माण होणाऱ्या तंट्यांच्या बाबतीत तक्रारदाराने तंटामुक्त गाव समितीकडे केलेला अर्ज; तडजोडनाम्याची प्रत, न्यायालयाकडे सादर केलेला अर्ज, लोकन्यायालयासाठी विधी सेवा समितीकडे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे केलेला अर्ज अथवा पोच आणि प्राप्त झाला असल्यास न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा वा सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश.

(छ) अदखलपात्र फौजदारी तंट्यासंबंधी तंटामुक्त गाव समितीसमोर केलेल्या तडजोडनाम्याची प्रत.

(ज) दखलपात्र फौजदारी (Compoundable) तंट्यासंबंधी तडजोडनाम्याची प्रत, समरीसाठी न्यायालयाकडे केलेला अर्ज आणि न्यायालयाने दिलेल्या समरी आदेशाची प्रत.

**१२.७ मुल्यमापनाच्या वेळी वादी / प्रतिवादींची उपस्थिती**

जिल्हा मूल्यमापन समितीच्या भेटीच्या दिवशी तंटामुक्त गाव समिती शक्यतो सर्व मिटविलेल्या तंट्यातील वादी व प्रतिवादींना गावांमध्ये उपस्थित राहण्याबाबत दक्षता घेईल.

**१२.८ पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती**

मूल्यमापन समितीच्या भेटीच्यावेळी संबंधित गावाच्या तंटामुक्त गाव समितीचा सदस्य असलेला बीट अंमलदार आणि पोलीस ठाणे प्रमुखाने नेमून दिलेला अन्य पोलीस अधिकारी उपस्थित राहून मूल्यमापन समितीस सहकार्य करील.

**१२.९ जिल्हा मूल्यमापन समितीसाठी तंट्यांची संदर्भ यादी**

सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेली तालुकास्तरीय समिती ही विविध न्यायालये, विविध शासकीय प्राधिकारी, प्राधिकरणे, इ. यांचेकडे मूल्यमापन करावयाच्या गावातील ३० सप्टेंबर पर्यंत प्रलंबित असलेल्या चारही प्रकारच्या दाखल तंट्यांच्या गावनिहाय याद्या तयार करील आणि तालुक्याचे तहसीलदार व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा मूल्यमापन समितीस उपलब्ध करून देईल.

**१२.१० जिल्हा मूल्यमापन समितीने गावामध्ये गेल्यानंतर करावयाची कार्यवाही**

१) जिल्हा मूल्यमापन समिती तालुक्याचे तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांची भेट घेईल व मूल्यमापन करावयाच्या गावामध्ये दिनांक ३० सप्टेंबर रोजी प्रलंबित असलेल्या चार प्रकारच्या दाव्यांची गावनिहाय तयार केलेली यादी त्यांच्याकडून प्राप्त करून घेईल. तंटामुक्त गाव समितीने नोंदविलेल्या दाखल तंट्यांच्या संख्येची खात्री करण्यासाठी या याद्यांचा संदर्भ म्हणून उपयोग करण्यात येईल. या यादीपेक्षा तंटामुक्त गाव समितीने

नोंदविलेले दाखल तंटे कमी किंवा जास्त असू शकतील. या याद्यांच्या आधारे तंटामुक्त गाव समितीने गावातील दाखल सर्व तंटे नोंदविले आहेत किंवा काय याची मूल्यमापन समिती खातरजमा करेल. त्यासाठी जरुर तर समिती ग्रामस्थांकडून खात्री करुन घेईल.

या संदर्भ याद्यांमधील तंट्यांच्या संख्येपेक्षा नोंदविलेल्या तंट्यांच्या संख्येमध्ये तफावत दिसून आल्यास, तंटामुक्त गाव समितीचे स्पष्टीकरण विचारात घेवून दाखल तंट्यांची संख्या निश्चित केली जाईल आणि सदर संख्या मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी निश्चित करण्यासाठी ग्राह्य मानण्यात येईल.

२) मूल्यमापन समिती गावातील तंटामुक्त गाव समितीची व ग्रामस्थांची बैठक घेईल.

३) मोहीम कालावधीत केलेल्या कामांची माहिती तंटामुक्त गाव समितीकडून घेवून स्वयंमूल्यमापन अहवाल, नोंदवह्या व अभिलेख तपासेल.

४) सर्व प्रकारच्या दाखल तंट्यांची तसेच नव्याने निर्माण झालेल्या तंट्यांची माहिती संकलित करुन त्यांच्या नोंदी; नोंदवही क्र. २-अ, २-ब, ३-अ आणि ३-ब मध्ये तंटामुक्त गाव समितीने घेतल्या आहेत याची खात्री करील.

५) तंटामुक्त गाव समितीने तयार केलेला स्वयंमूल्यमापन अहवाल शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार तपासण्यात येईल.

६) चारही प्रकारच्या मिटवलेल्या तंट्यांतील किमान प्रत्येकी दोन तंट्यातील वादी व प्रतिवादी यांच्याशी संपर्क साधून तंटा मिटल्याची खात्री करील.

७) तंटामुक्त गाव समितीने परिशिष्ट - ६ मध्ये नमूद केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या असल्याची खातरजमा करण्यासाठी जिल्हा मूल्यमापन समिती खालील मुद्दे विचारात घेईल.

(अ) तंटामुक्त गाव समितीने नोंदवही क्रमांक १, परिशिष्ट - ६ व त्या सोबत सादर केलेली पूरक माहिती तपासणे.

(ब) तंटामुक्त गाव समितीशी चर्चा करुन केलेल्या उपाययोजनांची माहिती घेणे.

(क) प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अथवा उपउपाययोजनांची कार्यवाही करण्याची जबाबदारी ज्यांनी पार पाडली त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून माहिती घेणे.

(ड) गावातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विविध मंडळे, महिलामंडळे, महिला बचत गट, इतर संस्था यांचे प्रमुख, पदाधिकारी व सदस्य यांच्याशी चर्चा करुन माहिती घेणे.

८) जिल्हा मूल्यमापन समिती शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार तंटे मिटवले गेले आहेत आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या गेल्या आहेत याची खात्री करुन गुणदान करील.

९) गावाच्या लोकसंख्येच्या आधारावर पुरस्कार दिले जाणार असल्यामुळे मूल्यमापन समिती सन २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायतीची लोकसंख्या योग्य असल्याची खात्री करील व तसा उल्लेख मूल्यमापन अहवालात करील.

**१२.११ गुणदानासाठी तंटा मिटविला आहे असे समजण्यासाठी तपासावयाच्या व गुणदानासाठी विचारात घ्यावयाच्या बाबी -**

खाली नमूद केलेले निकष विचारात घेऊन, प्रत्येक तंटा मिटला आहे असे समजण्यात येईल व त्यासाठी पूर्ण गुण देण्यात येतील.

**१) दिवाणी, महसूली व इतर तंटे**

(अ) तडजोडनाम्यानुसार न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा, सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकूमनामा, आदेश प्राप्त झाला असल्यास पहाण्यात येईल.

(ब) तडजोडनाम्याप्रमाणे आदेश होण्यासाठी अर्ज न्यायालयामध्ये, विधीसेवा समितीकडे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाखल केला असल्यास अर्ज व अर्जाची पोंच तपासण्यात येईल.

(क) दिनांक ३० एप्रिल पूर्वी तंटा मिटविला आहे याची तडजोडनामा पाहून खात्री केली जाईल.

दिनांक ३० एप्रिलपूर्वी तडजोडनामा झाला असेल व त्यानुसार आदेश होण्यासाठी न्यायालयात, विधीसेवा समितीकडे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करुन त्याची पोच मिळविली असल्यास, न्यायालयाच्या, लोकन्यायालयाच्या, सक्षम प्राधिकाऱ्याच्या अंतिम आदेशाची प्रत येण्यास विलंब लागेल हे विचारात घेऊन जिल्हा मूल्यमापन समिती असा तंटा मिटला आहे असे समजून त्यासाठीचे पूर्ण गुण देईल.

**२) फौजदारी तंटे**

**(अ) अदखलपात्र फौजदारी तंटे**

तंटामुक्त गाव समितीने उभय पक्षकारांमध्ये तडजोड घडवून आणून तडजोडनामा तयार करुन तंटा मिटविला असेल तर तो तडजोडनामा तपासून तंटा मिटल्याचे गृहीत धरुन पूर्ण गुण देण्यात येतील. या तंट्यांच्या बाबतीत न्यायालय/लोकन्यायालय यांच्या आदेशाची आवश्यकता नाही.

**(ब) दखलपात्र फौजदारी तंटे (Compoundable)**

(१) तडजोडनाम्यानुसार न्यायालयाच्या समरी आदेशाची प्रत पहाण्यात येईल.

(२) समरी मिळविण्यासाठी तडजोडनामा न्यायालयात/विधीसेवा समितीकडे दाखल केला असल्यास अशा अर्जाची प्रत व पोच पहाण्यात येईल.

(३) ३० एप्रिल पूर्वी तंटा मिटविला असल्याचा तडजोडनामा पहाण्यात येईल.

दिनांक ३० एप्रिल पूर्वी तडजोडनामा झाला असल्यास, न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून तंटा मिटल्याचे गृहित धरुन पूर्ण गुण देण्यात येतील.

**(क) दखलपात्र फौजदारी तंटे (Non-Compoundable)**

नोंदवही क्र.२ब व ३ब मध्ये नोंदविलेल्या दखलपात्र फौजदारी (Non-Compoundable) तंट्यांची मूल्यमापन समिती माहिती घेईल व अशा तंट्यांची यादी परिशिष्ट-६ मधील प्रपत्र-६ मध्ये जिल्हा

स्तरावरील कार्यकारी समितीस मूल्यमापन अहवालासोबत सादर करेल. या प्रवर्गातील तंटे समितीने मिटवायचे नाहीत. हे तंटे गुणदानासाठी विचारात घेण्यात येणार नाहीत.

## १२.१२ जिल्हा मूल्यमापन समितीसाठी गुणदानाची पद्धत

१) दाखल व नव्याने निर्माण झालेले तंटे यापैकी मिटविलेल्या तंट्यांच्या बाबतीत वरील परिच्छेद ७.२, ७.३, १२.६ व १२.११ विचारात घेऊन समिती एकमताने गुणदान करील.

२) गुणदानसंदर्भासाठी वरील **परिच्छेद-११** व **परिशिष्ट-३** अनुसार गुणदान करण्यात येईल. त्यासोबत दिलेली उदाहरणे मार्गदर्शक म्हणून विचारात घेण्यात येतील.

३) मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी अपूर्णांकात आल्यास ती त्या पुढील पूर्णांकामध्ये परिगणीत करण्यात येईल. (उदा.९०.१७ =९१ असे परिगणित करावे.)

४) तंटामुक्त गाव समितीने त्यांच्या स्वयंमूल्यमापन अहवालामध्ये दर्शविलेल्या आंकडेवारीमध्ये जिल्हा मूल्यमापन समितीस मूल्यमापनाच्या वेळी चार प्रकारातील तंट्यांची एकूण संख्या आणि मिटविलेल्या तंट्यांची संख्या यामध्ये तपासणीअंती फरक दिसून आल्यास जिल्हा मूल्यामापन समिती तपासणीत त्या त्या तंट्यांच्या प्रकारासाठी दिसून आलेल्या तंट्याच्या अंतिम आकडेवारीनुसार मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी काढेल व त्या टक्केवारीच्या आधारे गुणदान करुन गाव तंटामुक्त झाले किंवा कसे, या निर्णयाप्रत येईल.

५) तंट्यांच्या एका किंवा एकापेक्षा अधिक प्रकारामध्ये काही गावामध्ये दाखल किंवा नवीन निर्माण झालेला एकही तंटा प्रलंबित नाही अशी परिस्थिती दिसून आल्यास वरील परिच्छेद ७.२ (१) मधील कार्यवाही तंटामुक्त गाव समितीने काटेकोरपणे केली आहे काय, याची कसून खात्री मूल्यमापन समिती करेल. मूल्यमापन समितीच्या खात्रीनंतर एखाद्या प्रकारामध्ये एकही तंटा गावामध्ये दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी प्रलंबित नसेल किंवा त्यानंतर नवीन तंटा निर्माण झालेला नसेल, तर त्या तंट्याच्या प्रकारासाठीचे किमान गुण देण्यात येतील. अशा गावामध्ये तंटामुक्त गाव समितीने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोर तपासणी करुन त्यानुसार गुणदान करण्यात येईल.

ज्या गावात तंट्याच्या चारही प्रकारातील जुना तंटा प्रलंबित नसेल आणि नवीन तंटा निर्माण झालेला नसेल अशा गावांना तंट्याच्या प्रत्येक प्रकारासाठी किमान गुण देण्यात येतील. तसेच अशा गावाने राबविलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे मूल्यमापन करुन गुणदान करुन त्या आधारे गाव तंटामुक्त झाले आहे किंवा कसे, याचा निर्णय घेण्यात येईल.

६) प्रतिबंधात्मक उपाययोजनासंबंधी प्रत्येक सदस्य गुण द्यायच्या प्रत्येक मुद्यावर स्वतंत्र गुण देईल. मूल्यमापनासाठी समितीतील उपस्थित सदस्यांच्या गुणांचे एकत्रीकरण करुन उपस्थित सदस्यांच्या संख्येने भागून त्यांची सरासरी काढण्यात येईल व त्या आधारे प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे गुण निश्चित करण्यात येतील. त्याबाबतच्या अहवालावर मूल्यमापन समितीतील सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील.

(७) प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या सर्व शीर्षाखालील प्रत्येक उपउपाययोजना केल्याबाबतची खात्री पटल्यास त्या उपउपाययोजनांसबंधी गुण देण्यात येतील. केलेल्या उपउपाययोजनांची व्याप्ती, लोकसहभाग, परिणामकारकता यांचा विचार करून त्या उपउपाययोजनेस विहित केलेले पूर्ण किंवा त्यापेक्षा कमी गुण देण्यात येतील. उपउपाययोजनांना मिळालेले गुण एकत्र करून प्रत्येक शीर्षाखालील प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठीचे एकूण गुण देण्यात येतील.

**१२.१३ जिल्हा मूल्यमापन समितीने अहवाल सादर करणे**

(१) जिल्हा मूल्यमापन समिती प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या बाबतीत या शासन निर्णयाच्यां **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-१ प्रमाणे मूल्यमापन अहवाल तयार करेल. तसेच दाखल तंटे व नव्याने निर्माण होणारे तंटे याबाबत या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-२ प्रमाणे मूल्यमापन अहवाल तयार करेल. मूल्यमापनाचा एकत्रित अहवाल शासन निर्णयाच्या **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-३ मध्ये तयार करून त्यामध्येच तंटामुक्त म्हणून जाहीर करण्यासाठी गाव पात्र आहे किंवा कसे, याबाबतचा निष्कर्ष नोंदविण्यात येईल. गावास अतिरिक्त गुण मिळाले असल्यास विशेष पुरस्कारासाठी ते गाव पात्र आहे काय, याबाबतचा शेरा नोंदविण्यात येईल.

(२) जिल्हा मूल्यमापन समिती तालुक्यातील सर्व तंटामुक्त घोषित गावांचे मूल्यमापन पूर्ण केल्यानंतर मूल्यमापन केलेल्या गावातील तंटामुक्त गाव समित्यांचे अध्यक्ष, निमंत्रक आणि त्या ग्रामपंचायतीचे सरपंच यांना तहसीलदार कार्यालयात एकत्रित बोलावून त्यांच्यासमोर मूल्यमापनाचे निकाल घोषित करेल. जी गावे मूल्यमापनामध्ये कमी गुण मिळाल्यामुळे अपात्र ठरली असतील त्यांची कारणमीमांसा त्यांना समक्ष सांगण्यात येईल. तालुक्यातील गावांची दिसून आलेली वैशिष्ट्येसुद्धा सर्वांसमोर माहितीसाठी सांगण्यात येतील.

(३) जिल्हा मूल्यमापन समितीचे काम पूर्ण होताच आणि कोणत्याही परिस्थितीत दरवर्षी दिनांक ५ जून, पूर्वी समिती त्यांचा मूल्यमापन अहवाल जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सचिव तथा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना पाठवील.

(४) पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी त्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा मूल्यमापनाचा गावनिहाय, पोलीस ठाणेनिहाय व तालुकानिहाय अहवाल तयार करून जिल्हा कार्यकारी समितीच्या मान्यतेने दिनांक १० जून पूर्वी **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-४ मध्ये शासन, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना पाठवतील. अहवालासोबत जिल्ह्यातील सर्व जिल्हा मूल्यमापन समित्यांची यादी शासनास पाठविण्यात येईल.

**१२.१४ जिल्हा बाह्यमूल्यमापन करणे**

(१) जिल्हा मूल्यमापनाचा अहवाल आणि त्यासोबत जिल्हा मूल्यमापन समित्यांची यादी शासनास प्राप्त झाल्यानंतर कोणत्या जिल्ह्याच्या मूल्यमापन समित्या कोणत्या जिल्ह्याच्या बाह्यमूल्यमापनासाठी पाठविण्यात येतील ते शासन घोषित करेल. सर्व जिल्ह्यांना त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

(२) जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे बाह्यमूल्यमापनासाठी जिल्हा वाटप होताच त्यांच्या जिल्ह्यातील मूल्यमापन समित्या बाह्यमूल्यमापनासाठी दुसऱ्या जिल्ह्याला विहित मुदतीत पाठविण्याची कार्यवाही करतील.

(३) जिल्हा बाह्यमूल्यमापन समिती वरील उपपरिच्छेद (५), (६), (१०), (११) आणि (१२) मध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करून गावांचे मूल्यमापन करेल आणि ज्या जिल्ह्यातील गावाचे मूल्यमापन केले त्या जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सचिव तथा पोलीस अधीक्षक यांना त्यांचा अहवाल **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-१, २ आणि ३ मध्ये १५ जुलै पूर्वी पाठवेल. त्याचप्रमाणे त्यांच्या मूळ जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना जिल्हा बाह्य-मूल्यमापनाचा थोडक्यात लेखी अहवाल देईल.

(४) तंटामुक्त गाव समिती स्वयंमूल्यमापन अहवाल तयार करताना आणि जिल्हा मूल्यमापन समिती जिल्हा अंतर्गत मूल्यमापनाच्या वेळी तंटामुक्त गाव समितीने तंटा मिटविला असेल व तडजोडनाम्यानुसार संबंधित न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा, सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकुमनामा/आदेश प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज केला असेल तर असा तंटा मिटल्याचे गृहित धरून गुणदान करील. मात्र, जिल्हा बाह्यमूल्यमापन समिती मूल्यमापनाच्या वेळी अशा तंट्यांच्या बाबतीत वरील उपपरिच्छेद (१०) मधील सूचनांप्रमाणे आवश्यक त्या तंट्यांच्या प्रकाराबाबतीत न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा अथवा सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकुमनामा/आदेश तंटामुक्त गाव समितीने किंवा पक्षकारांने प्राप्त करून घेतला असेल तरच असा तंटा मिटल्याचे मानेल व त्यानुसार गुणदान करील.

(५) जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे त्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा कार्यकारी समितीच्या मान्यतेने जिल्ह्याच्या बाह्यमूल्यमापनाचा अहवाल २५ जुलै पूर्वी शासन, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-५ मध्ये पाठवतील. शासनास पाठविण्यात आलेला अहवाल जिल्हास्तरीय सल्लागार व अंमलबजावणी समितीची बैठक आयोजित करून त्यांच्यासमोर सादर करण्यात येईल.

**१२.१५ जिल्हा बाह्यमुल्यमापन समितीचा गुण देण्याचा निर्णय अंतिम असेल. अपवादात्मक परिस्थितीत विभागीय आयुक्त पुनर्निरीक्षण करून घेतील.**

**१२.१६ समितीच्या सदस्यांसाठी वाहन व निवास व्यवस्था**

(१) जिल्हा मूल्यमापन समितीच्या गावभेटींसाठी दोन वाहनांची व्यवस्था संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी करतील. ज्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका मूल्यमापन समितीमध्ये केल्या जातील अशा अधिकाऱ्यांची वाहने शक्यतोवर त्या मूल्यमापन समित्यांना देण्यात येतील. कमी पडणारी वाहने जिल्हाधिकारी अधिग्रहित करून देतील.

(२) जिल्हा बाह्यमूल्यमापनासाठी जाणाऱ्या मूल्यमापन समित्यांनाही ज्या जिल्ह्याच्या समित्या आहेत, त्या जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांनी वाहने उपलब्ध करून द्यावीत. मात्र, ज्या जिल्ह्यामध्ये मूल्यमापन समित्या बाहय - मूल्यमापनासाठी जातील त्या जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक मूल्यमापन समित्यांच्या सर्व वाहनांना इंधन पुरवठा त्यांच्या मोटार परिवहन विभागामार्फत करतील.

(३) शासकीय विश्रामगृहात समितीच्या सदस्यांच्या निवासाची व्यवस्था पोलीस अधीक्षक हे करतील.

**१२.१७ राज्यातील तंटामुक्त झालेल्या गावांची घोषणा शासनाच्या वतीने दरवर्षी दिनांक ९ ऑगस्ट रोजी करण्यात येईल.**

## १३. पुरस्कार योजना

(१) तंटामुक्त झालेल्या सर्व गावांना पुढीलप्रमाणे लोकसंख्येच्या आधारावर शासनाच्या वतीने रोख रकमेचा पुरस्कार आणि सन्मानचिन्ह देऊन राज्य पातळीवर समारंभपूर्वक गौरविण्यात येईल.

| **तंटामुक्त गावाची लोकसंख्या** | **पुरस्काराची रक्कम** |
|---|---|
| १००० पर्यंत | रुपये १,००,००० |
| १००१ ते २००० पर्यंत | रुपये २,००,००० |
| २००१ ते ३००० पर्यंत | रुपये ३,००,००० |
| ३००१ ते ४००० पर्यंत | रुपये ४,००,००० |
| ४००१ ते ५००० पर्यंत | रुपये ५,००,००० |
| ५००१ ते १०००० पर्यंत | रुपये ७,००,००० |
| १०००१ अथवा त्याहून अधिक | रुपये १०,००,०००. |

(२) १९० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना त्यांना मिळणाऱ्या पुरस्काराशिवाय मिळालेल्या पुरस्कार रकमेच्या २५% इतकी रक्कम विशिष्ट सन्मानचिन्हासह **"शांतता पुरस्कार"** म्हणून देण्यात येईल.

(३) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत पुरस्कार प्राप्त गावांना पुन्हा पुरस्कार अनुज्ञेय असणार नाही. तथापि, अशा गावांनी पुढील वर्षांमध्ये तंटे मिटविण्यामध्ये सातत्य राखल्यास **"विशेष पुरस्कार"** देण्याबाबत राज्यस्तरीय समिती विचार करेल. याबाबत स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

## १४. पुरस्कार रकमेचा विनियोग

तंटामुक्त गाव पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती ग्रामसभेच्या मान्यतेने पुरस्काराची रक्कम केवळ मत्ता उभारण्याबाबतच्या विकास कामासाठी खर्च करतील. याबाबत मार्गदर्शक सूचना **परिशिष्ट-७** प्रमाणे विहित करण्यात येत आहेत. या सूचना मोहिमेच्या प्रथम वर्षापासून लागू असतील.

## १५. प्रसिद्धीसाठी पुरस्कार

(१) समाजात स्थायी व समतोल विकास साधावयाचा असेल तर सामाजिक शांतता व सुरक्षितता असणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी निर्माण होणारे तंटे ग्रामपातळीवरच सामोपचाराने मिटवून व भविष्यात तंटे निर्माण होणार नाहीत असे वातावरण निर्माण करून लोकांनी स्थायी विकासाच्या

मार्गावरुन वाटचाल करावी असा मोहिमेचा असलेला व्यापक उद्देश सकारात्मक पत्रकारितेचा भाग म्हणून हा विचार, प्रसार माध्यमे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. त्यादृष्टीने मोहिम प्रभावी व यशस्वीरित्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेला वस्तुनिष्ठ प्रसिद्धी देणाऱ्या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना पुढीलप्रमाणे जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तर या प्रत्येक स्तरावर खालीलप्रमाणे तीन पुरस्कार देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हास्तरः | १) प्रथम पुरस्कार | रु. २५,०००/- |
| | २) द्वितीय पुरस्कार | रु. १५,०००/- |
| | ३) तृतीय पुरस्कार | रु. १०,०००/- |
| २) विभागीयस्तर : | १) प्रथम पुरस्कार | रु. १,००,०००/- |
| | २) द्वितीय पुरस्कार | रु. ७५,०००/- |
| | ३ ) तृतीय पुरस्कार | रु. ५०,०००/- |
| ३) राज्यस्तरः | १) प्रथम पुरस्कार | रु. २,५०,०००/- |
| | २) द्वितीय पुरस्कार | रु. १,५०,०००/- |
| | ३) तृतीय पुरस्कार | रु. १,००,०००/- |

२) वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर वरीलप्रमाणे प्रत्येक स्तरावर तीन पुरस्कार देण्याकरिता बातमीदारांची निवड करण्यासाठी जिल्हास्तर समिती, विभागीयस्तर समिती व राज्यस्तर समितीच्या रचना आणि बातमीदारांनी केलेल्या प्रसिद्धीच्या मूल्यमापनाचे निकष व देण्यात येणारे गुण या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-८** येथे विहित करण्यात येत आहेत.

३) जिल्हास्तर समिती, विभागीयस्तर समिती व राज्यस्तर समितीचे अध्यक्ष, निवड समित्यांचे गठण दरवर्षी दिनांक १५ मे पूर्वी करतील.

४) बातमीदारांनी **परिशिष्ट-८** मधील "अटी व शर्ती" मध्ये विहित केलेल्या कालावधीतील प्रसिद्ध केलेले साहित्य पुरस्कार पात्रतेकरिता मूल्यमापनार्थ ग्राह्य धरण्यात येईल.

५) **परिशिष्ट-८** च्या प्रपत्र-१ येथे पुरस्कारासाठी समित्यांकडे करावयाच्या अर्जाचा नमूना देण्यात आला आहे. त्या नमुन्यात बातमीदारांनी संबंधीत समितींच्या सदस्य सचिवांकडे विहित मुदतीत केलेले अर्जच विचारात घेण्यात येतील.

## १६. अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविणे

अ) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत व्यापक लोकसहभाग अपेक्षित असून, मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, तालुकास्तरावरील समिती व पोलीस ठाणेस्तरावरील समिती या समित्यांमधील अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तंटामुक्त गाव समितीस येणाऱ्या सर्व अडचणीचे निराकरण करुन त्यांना त्यांच्या कार्यासाठी प्रोत्साहन द्यावयाचे आहे. तसेच विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्रे) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात मोहिमेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेवून प्रभावी अंमलबजावणी करावयाची आहे. नेहमीच्या प्रशासकीय कामकाजापेक्षा या मोहिमेतील कामकाज हे

५) प्रत्येक मिटविलेल्या तंट्याची खालील कागदपत्रांचा समावेश असलेली परिक्षणासाठी वैयक्तिक नस्ती (फाईल्स).

(क) तंट्यांसंबंधी न्यायालयात वा संबंधित प्राधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेल्या दाव्यांची प्रत अथवा यादी.

(ख) तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष, निमंत्रक व पक्षकार यांच्या स्वाक्षरी असलेली तडजोडनाम्याची प्रत.

(ग) संबंधित न्यायालयाकडे, सक्षम प्राधिकाऱ्याकडे तडजोडनाम्याप्रमाणे आदेश होण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत आणि पोच किंवा विधी सेवा समितीकडे लोकन्यायालयामधून तडजोडीप्रमाणे आदेश होण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत आणि पोच.

(घ) संबंधित न्यायालयाने, लोकन्यायालयाने, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाची/ हुकूमनाम्याची प्रत.

(च) नव्याने निर्माण होणाऱ्या तंट्यांच्या बाबतीत तक्रारदारांने तंटामुक्त गाव समितीकडे केलेला अर्ज; तडजोडनाम्याची प्रत, न्यायालयाकडे सादर केलेला अर्ज, लोकन्यायालयासाठी विधी सेवा समितीकडे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे केलेला अर्ज अथवा पोच आणि प्राप्त झाला असल्यास न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा वा सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश.

(छ) अदखलपात्र फौजदारी तंट्यासंबंधी तंटामुक्त गाव समितीसमोर केलेल्या तडजोडनाम्याची प्रत.

(ज) दखलपात्र फौजदारी (Compoundable) तंट्यासंबंधी तडजोडनाम्याची प्रत, समरीसाठी न्यायालयाकडे केलेला अर्ज आणि न्यायालयाने दिलेल्या समरी आदेशाची प्रत.

**१२.७ मुल्यमापनाच्या वेळी वादी / प्रतिवादींची उपस्थिती**

जिल्हा मूल्यमापन समितीच्या भेटीच्या दिवशी तंटामुक्त गाव समिती शक्यतो सर्व मिटविलेल्या तंट्यातील वादी व प्रतिवादींना गावांमध्ये उपस्थित राहण्याबाबत दक्षता घेईल.

**१२.८ पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती**

मूल्यमापन समितीच्या भेटीच्यावेळी संबंधित गावाच्या तंटामुक्त गाव समितीचा सदस्य असलेला बीट अंमलदार आणि पोलीस ठाणे प्रमुखाने नेमून दिलेला अन्य पोलीस अधिकारी उपस्थित राहून मूल्यमापन समितीस सहकार्य करील.

**१२.९ जिल्हा मूल्यमापन समितीसाठी तंट्यांची संदर्भ यादी**

सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये विहित केलेली तालुकास्तरीय समिती ही विविध न्यायालये, विविध शासकीय प्राधिकारी, प्राधिकरणे, इ. यांचेकडे मूल्यमापन करावयाच्या गावातील ३० सप्टेंबर पर्यंत प्रलंबित असलेल्या चारही प्रकारच्या दाखल तंट्यांच्या गावनिहाय याद्या तयार करील आणि तालुक्याचे तहसीलदार व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा मूल्यमापन समितीस उपलब्ध करून देईल.

**१२.१० जिल्हा मूल्यमापन समितीने गावामध्ये गेल्यानंतर करावयाची कार्यवाही**

१) जिल्हा मूल्यमापन समिती तालुक्याचे तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांची भेट घेईल व मूल्यमापन करावयाच्या गावामध्ये दिनांक ३० सप्टेंबर रोजी प्रलंबित असलेल्या चार प्रकारच्या दाव्यांची गावनिहाय तयार केलेली यादी त्यांच्याकडून प्राप्त करून घेईल. तंटामुक्त गाव समितीने नोंदविलेल्या दाखल तंट्यांच्या संख्येची खात्री करण्यासाठी या याद्यांचा संदर्भ म्हणून उपयोग करण्यात येईल. या यादीपेक्षा तंटामुक्त गाव समितीने

नोंदविलेले दाखल तंटे कमी किंवा जास्त असू शकतील. या याद्यांच्या आधारे तंटामुक्त गाव समितीने गावातील दाखल सर्व तंटे नोंदविले आहेत किंवा काय याची मूल्यमापन समिती खातरजमा करेल. त्यासाठी जरुर तर समिती ग्रामस्थांकडून खात्री करुन घेईल.

या संदर्भ याद्यांमधील तंट्यांच्या संख्येपेक्षा नोंदविलेल्या तंट्यांच्या संख्येमध्ये तफावत दिसून आल्यास, तंटामुक्त गाव समितीचे स्पष्टीकरण विचारात घेवून दाखल तंट्यांची संख्या निश्चित केली जाईल आणि सदर संख्या मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी निश्चित करण्यासाठी ग्राह्य मानण्यात येईल.

२) मूल्यमापन समिती गावातील तंटामुक्त गाव समितीची व ग्रामस्थांची बैठक घेईल.

३) मोहीम कालावधीत केलेल्या कामांची माहिती तंटामुक्त गाव समितीकडून घेवून स्वयंमूल्यमापन अहवाल, नोंदवह्या व अभिलेख तपासेल.

४) सर्व प्रकारच्या दाखल तंट्यांची तसेच नव्याने निर्माण झालेल्या तंट्यांची माहिती संकलित करुन त्यांच्या नोंदी; नोंदवही क्र. २-अ, २-ब, ३-अ आणि ३-ब मध्ये तंटामुक्त गाव समितीने घेतल्या आहेत याची खात्री करील.

५) तंटामुक्त गाव समितीने तयार केलेला स्वयंमूल्यमापन अहवाल शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार तपासण्यात येईल.

६) चारही प्रकारच्या मिटवलेल्या तंट्यांतील किमान प्रत्येकी दोन तंट्यातील वादी व प्रतिवादी यांच्याशी संपर्क साधून तंटा मिटल्याची खात्री करील.

७) तंटामुक्त गाव समितीने परिशिष्ट - ६ मध्ये नमूद केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या असल्याची खातरजमा करण्यासाठी जिल्हा मूल्यमापन समिती खालील मुद्दे विचारात घेईल.

   (अ) तंटामुक्त गाव समितीने नोंदवही क्रमांक १, परिशिष्ट - ६ व त्या सोबत सादर केलेली पूरक माहिती तपासणे.

   (ब) तंटामुक्त गाव समितीशी चर्चा करुन केलेल्या उपाययोजनांची माहिती घेणे.

   (क) प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अथवा उपउपाययोजनांची कार्यवाही करण्याची जबाबदारी ज्यांनी पार पाडली त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून माहिती घेणे.

   (ड) गावातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विविध मंडळे, महिलामंडळे, महिला बचत गट, इतर संस्था यांचे प्रमुख, पदाधिकारी व सदस्य यांच्याशी चर्चा करुन माहिती घेणे.

८) जिल्हा मूल्यमापन समिती शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार तंटे मिटवले गेले आहेत आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या गेल्या आहेत याची खात्री करुन गुणदान करील.

९) गावाच्या लोकसंख्येच्या आधारावर पुरस्कार दिले जाणार असल्यामुळे मूल्यमापन समिती सन २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामपंचायतीची लोकसंख्या योग्य असल्याची खात्री करील व तसा उल्लेख मूल्यमापन अहवालात करील.

## १२.११ गुणदानासाठी तंटा मिटविला आहे असे समजण्यासाठी तपासावयाच्या व गुणदानासाठी विचारात घ्यावयाच्या बाबी -

खाली नमूद केलेले निकष विचारात घेऊन, प्रत्येक तंटा मिटला आहे असे समजण्यात येईल व त्यासाठी पूर्ण गुण देण्यात येतील.

**१) दिवाणी, महसूली व इतर तंटे**

(अ) तडजोडनाम्यानुसार न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा, सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकूमनामा, आदेश प्राप्त झाला असल्यास पहाण्यात येईल.

(ब) तडजोडनाम्याप्रमाणे आदेश होण्यासाठी अर्ज न्यायालयामध्ये, विधीसेवा समितीकडे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाखल केला असल्यास अर्ज व अर्जाची पोंच तपासण्यात येईल.

(क) दिनांक ३० एप्रिल पूर्वी तंटा मिटविला आहे याची तडजोडनामा पाहून खात्री केली जाईल.

दिनांक ३० एप्रिलपूर्वी तडजोडनामा झाला असेल व त्यानुसार आदेश होण्यासाठी न्यायालयात, विधीसेवा समितीकडे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करुन त्याची पोच मिळविली असल्यास, न्यायालयाच्या, लोकन्यायालयाच्या, सक्षम प्राधिकाऱ्याच्या अंतिम आदेशाची प्रत येण्यास विलंब लागेल हे विचारात घेऊन जिल्हा मूल्यमापन समिती असा तंटा मिटला आहे असे समजून त्यासाठीचे पूर्ण गुण देईल.

**२) फौजदारी तंटे**

**(अ) अदखलपात्र फौजदारी तंटे**

तंटामुक्त गाव समितीने उभय पक्षकारांमध्ये तडजोड घडवून आणून तडजोडनामा तयार करुन तंटा मिटविला असेल तर तो तडजोडनामा तपासून तंटा मिटल्याचे गृहीत धरुन पूर्ण गुण देण्यात येतील. या तंट्यांच्या बाबतीत न्यायालय/लोकन्यायालय यांच्या आदेशाची आवश्यकता नाही.

**(ब) दखलपात्र फौजदारी तंटे (Compoundable)**

(१) तडजोडनाम्यानुसार न्यायालयाच्या समरी आदेशाची प्रत पहाण्यात येईल.

(२) समरी मिळविण्यासाठी तडजोडनामा न्यायालयात/विधीसेवा समितीकडे दाखल केला असल्यास अशा अर्जाची प्रत व पोच पहाण्यात येईल.

(३) ३० एप्रिल पूर्वी तंटा मिटविला असल्यांचा तडजोडनामा पहाण्यात येईल.

दिनांक ३० एप्रल पूर्वी तडजोडनामा झाला असल्यास, न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून तंटा मिटल्याचे गृहित धरुन पूर्ण गुण देण्यात येतील.

**(क) दखलपात्र फौजदारी तंटे (Non-Compoundable)**

नोंदवही क्र.२ब व ३ब मध्ये नोंदविलेल्या दखलपात्र फौजदारी (Non-Compoundable) तंट्यांची मूल्यमापन समिती माहिती घेईल व अशा तंट्यांची यादी परिशिष्ट-६ मधील प्रपत्र-६ मध्ये जिल्हा



T १२१७४ —३ अ

स्तरावरील कार्यकारी समितीस मूल्यमापन अहवालासोबत सादर करेल. या प्रवर्गातील तंटे समितीने मिटवायचे नाहीत. हे तंटे गुणदानासाठी विचारात घेण्यात येणार नाहीत.

## १२.१२ जिल्हा मूल्यमापन समितीसाठी गुणदानाची पद्धत

१) दाखल व नव्याने निर्माण झालेले तंटे यापैकी मिटविलेल्या तंट्यांच्या बाबतीत वरील परिच्छेद ७.२, ७.३, १२.६ व १२.११ विचारात घेऊन समिती एकमताने गुणदान करील.

२) गुणदानसंदर्भासाठी वरील **परिच्छेद-११** व **परिशिष्ट-३** अनुसार गुणदान करण्यात येईल. त्यासोबत दिलेली उदाहरणे मार्गदर्शक म्हणून विचारात घेण्यात येतील.

३) मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी अपूर्णांकात आल्यास ती त्या पुढील पूर्णांकामध्ये परिगणीत करण्यात येईल. (उदा.९०.१७ =९१ असे परिगणित करावे.)

४) तंटामुक्त गाव समितीने त्यांच्या स्वयंमूल्यमापन अहवालामध्ये दर्शविलेल्या आकडेवारीमध्ये जिल्हा मूल्यमापन समितीस मूल्यमापनाच्या वेळी चार प्रकारातील तंट्यांची एकूण संख्या आणि मिटविलेल्या तंट्यांची संख्या यामध्ये तपासणीअंती फरक दिसून आल्यास जिल्हा मूल्यामापन समिती तपासणीत त्या त्या तंट्यांच्या प्रकारासाठी दिसून आलेल्या तंट्याच्या अंतिम आकडेवारीनुसार मिटविलेल्या तंट्यांची टक्केवारी काढेल व त्या टक्केवारीच्या आधारे गुणदान करुन गाव तंटामुक्त झाले किंवा कसे, या निर्णयाप्रत येईल.

५) तंट्यांच्या एका किंवा एकापेक्षा अधिक प्रकारामध्ये काही गावामध्ये दाखल किंवा नवीन निर्माण झालेला एकही तंटा प्रलंबित नाही अशी परिस्थिती दिसून आल्यास वरील परिच्छेद ७.२ (१) मधील कार्यवाही तंटामुक्त गाव समितीने काटेकोरपणे केली आहे काय, याची कसून खात्री मूल्यमापन समिती करेल. मूल्यमापन समितीच्या खात्रीनंतर एखाद्या प्रकारामध्ये एकही तंटा गावामध्ये दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी प्रलंबित नसेल किंवा त्यानंतर नवीन तंटा निर्माण झालेला नसेल, तर त्या तंट्याच्या प्रकारासाठीचे किमान गुण देण्यात येतील. अशा गावामध्ये तंटामुक्त गाव समितीने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोर तपासणी करुन त्यानुसार गुणदान करण्यात येईल.

ज्या गावात तंट्याच्या चारही प्रकारातील जुना तंटा प्रलंबित नसेल आणि नवीन तंटा निर्माण झालेला नसेल अशा गावांना तंट्याच्या प्रत्येक प्रकारासाठी किमान गुण देण्यात येतील. तसेच अशा गावाने राबविलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे मूल्यमापन करुन गुणदान करुन त्या आधारे गाव तंटामुक्त झाले आहे किंवा कसे, याचा निर्णय घेण्यात येईल.

६) प्रतिबंधात्मक उपाययोजनासंबंधी प्रत्येक सदस्य गुण द्यायच्या प्रत्येक मुद्यावर स्वतंत्र गुण देईल. मूल्यमापनासाठी समितीतील उपस्थित सदस्यांच्या गुणांचे एकत्रीकरण करुन उपस्थित सदस्यांच्या संख्येने भागून त्यांची सरासरी काढण्यात येईल व त्या आधारे प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे गुण निश्चित करण्यात येतील. त्याबाबतच्या अहवालावर मूल्यमापन समितीतील सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात येतील.

(७) प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या सर्व शीर्षाखालील प्रत्येक उपउपाययोजना केल्याबाबतची खात्री पटल्यास त्या उपउपाययोजनांसबंधी गुण देण्यात येतील. केलेल्या उपउपाययोजनांची व्याप्ती, लोकसहभाग, परिणामकारकता यांचा विचार करून त्या उपउपाययोजनेस विहित केलेले पूर्ण किंवा त्यापेक्षा कमी गुण देण्यात येतील. उपउपाययोजनांना मिळालेले गुण एकत्र करून प्रत्येक शीर्षाखालील प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठीचे एकूण गुण देण्यात येतील.

**१२.१३ जिल्हा मूल्यमापन समितीने अहवाल सादर करणे**

(१) जिल्हा मूल्यमापन समिती प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या बाबतीत या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-१ प्रमाणे मूल्यमापन अहवाल तयार करेल. तसेच दाखल तंटे व नव्याने निर्माण होणारे तंटे याबाबत या शासन निर्णयाच्या **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-२ प्रमाणे मूल्यमापन अहवाल तयार करेल. मूल्यमापनाचा एकत्रित अहवाल शासन निर्णयाच्या **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-३ मध्ये तयार करून त्यामध्येच तंटामुक्त म्हणून जाहीर करण्यासाठी गाव पात्र आहे किंवा कसे, याबाबतचा निष्कर्ष नोंदविण्यात येईल. गावास अतिरिक्त गुण मिळाले असल्यास विशेष पुरस्कारासाठी ते गाव पात्र आहे काय, याबाबतचा शेरा नोंदविण्यात येईल.

(२) जिल्हा मूल्यमापन समिती तालुक्यातील सर्व तंटामुक्त घोषित गावांचे मूल्यमापन पूर्ण केल्यानंतर मूल्यमापन केलेल्या गावातील तंटामुक्त गाव समित्यांचे अध्यक्ष, निमंत्रक आणि त्या ग्रामपंचायतीचे सरपंच यांना तहसीलदार कार्यालयात एकत्रित बोलावून त्यांच्यासमोर मूल्यमापनाचे निकाल घोषित करेल. जी गावे मूल्यमापनामध्ये कमी गुण मिळाल्यामुळे अपात्र ठरली असतील त्यांची कारणमीमांसा त्यांना समक्ष सांगण्यात येईल. तालुक्यातील गावांची दिसून आलेली वैशिष्ट्येसुद्धा सर्वांसमोर माहितीसाठी सांगण्यात येतील.

(३) जिल्हा मूल्यमापन समितीचे काम पूर्ण होताच आणि कोणत्याही परिस्थितीत दरवर्षी दिनांक ५ जून, पूर्वी समिती त्यांचा मूल्यमापन अहवाल जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सचिव तथा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना पाठवील.

(४) पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी त्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा मूल्यमापनाचा गावनिहाय, पोलीस ठाणेनिहाय व तालुकानिहाय अहवाल तयार करून जिल्हा कार्यकारी समितीच्या मान्यतेने दिनांक १० जून पूर्वी **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-४ मध्ये शासन, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना पाठवतील. अहवालासोबत जिल्ह्यातील सर्व जिल्हा मूल्यमापन समित्यांची यादी शासनास पाठविण्यात येईल.

**१२.१४ जिल्हा बाह्यमूल्यमापन करणे**

(१) जिल्हा मूल्यमापनाचा अहवाल आणि त्यासोबत जिल्हा मूल्यमापन समित्यांची यादी शासनास प्राप्त झाल्यानंतर कोणत्या जिल्ह्याच्या मूल्यमापन समित्या कोणत्या जिल्ह्याच्या बाह्यमूल्यमापनासाठी पाठविण्यात येतील ते शासन घोषित करेल. सर्व जिल्ह्यांना त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

(२) जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे बाह्यमूल्यमापनासाठी जिल्हा वाटप होताच त्यांच्या जिल्ह्यातील मूल्यमापन समित्या बाह्यमूल्यमापनासाठी दुसऱ्या जिल्ह्याला विहित मुदतीत पाठविण्याची कार्यवाही करतील.

(३) जिल्हा बाह्यमूल्यमापन समिती वरील उपपरिच्छेद (५), (६), (१०), (११) आणि (१२) मध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करून गावांचे मूल्यमापन करेल आणि ज्या जिल्ह्यातील गावाचे मूल्यमापन केले त्या जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सचिव तथा पोलीस अधीक्षक यांना त्यांचा अहवाल **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-१, २ आणि ३ मध्ये १५ जुलै पूर्वी पाठवेल. त्याचप्रमाणे त्यांच्या मूळ जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना जिल्हा बाह्य-मूल्यमापनाचा थोडक्यात लेखी अहवाल देईल.

(४) तंटामुक्त गाव समिती स्वयंमूल्यमापन अहवाल तयार करताना आणि जिल्हा मूल्यमापन समिती जिल्हा अंतर्गत मूल्यमापनाच्या वेळी तंटामुक्त गाव समितीने तंटा मिटविला असेल व तडजोडनाम्यानुसार संबंधित न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा, सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकुमनामा/आदेश प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज केला असेल तर असा तंटा मिटल्याचे गृहित धरून गुणदान करील. मात्र, जिल्हा बाह्यमूल्यमापन समिती मूल्यमापनाच्या वेळी अशा तंट्यांच्या बाबतीत वरील उपपरिच्छेद (१०) मधील सूचनांप्रमाणे आवश्यक त्या तंट्यांच्या प्रकाराबाबतीत न्यायालयाचा, लोकन्यायालयाचा अथवा सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकुमनामा/आदेश तंटामुक्त गाव समितीने किंवा पक्षकारांने प्राप्त करून घेतला असेल तरच असा तंटा मिटल्याचे मानेल व त्यानुसार गुणदान करील.

(५) जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे त्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने जिल्हा कार्यकारी समितीच्या मान्यतेने जिल्ह्याच्या बाह्यमूल्यमापनाचा अहवाल २५ जुलै पूर्वी शासन, पोलीस महासंचालक, विभागीय आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र) यांना **परिशिष्ट-६** मधील प्रपत्र-५ मध्ये पाठवतील. शासनास पाठविण्यात आलेला अहवाल जिल्हास्तरीय सल्लागार व अंमलबजावणी समितीची बैठक आयोजित करून त्यांच्यासमोर सादर करण्यात येईल.

**१२.१५ जिल्हा बाह्यमुल्यमापन समितीचा गुण देण्याचा निर्णय अंतिम असेल. अपवादात्मक परिस्थितीत विभागीय आयुक्त पुनर्निरीक्षण करून घेतील.**

**१२.१६ समितीच्या सदस्यांसाठी वाहन व निवास व्यवस्था**

(१) जिल्हा मूल्यमापन समितीच्या गावभेटींसाठी दोन वाहनांची व्यवस्था संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी करतील. ज्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका मूल्यमापन समितीमध्ये केल्यां जातील अशा अधिकाऱ्यांची वाहने शक्यतोवर त्या मूल्यमापन समित्यांना देण्यात येतील. कमी पडणारी वाहने जिल्हाधिकारी अधिग्रहित करून देतील.

(२) जिल्हा बाह्यमूल्यमापनासाठी जाणाऱ्या मूल्यमापन समित्यांनाही ज्या जिल्ह्याच्या समित्या आहेत, त्या जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांनी वाहने उपलब्ध करून द्यावीत. मात्र, ज्या जिल्ह्यामध्ये मूल्यमापन समित्या बाहय-मूल्यमापनासाठी जातील त्या जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक मूल्यमापन समित्यांच्या सर्व वाहनांना इंधन पुरवठा त्यांच्या मोटार परिवहन विभागामार्फत करतील.

(३) शासकीय विश्रामगृहात समितीच्या सदस्यांच्या निवासाची व्यवस्था पोलीस अधीक्षक हे करतील.

**१२.१७ राज्यातील तंटामुक्त झालेल्या गावांची घोषणा शासनाच्या वतीने दरवर्षी दिनांक ९ ऑगस्ट रोजी करण्यात येईल.**

## १३. पुरस्कार योजना

(१) तंटामुक्त झालेल्या सर्व गावांना पुढीलप्रमाणे लोकसंख्येच्या आधारावर शासनाच्या वतीने रोख रकमेचा पुरस्कार आणि सन्मानचिन्ह देऊन राज्य पातळीवर समारंभपूर्वक गौरविण्यात येईल.

| तंटामुक्त गावाची लोकसंख्या | पुरस्काराची रक्कम |
|---|---|
| १००० पर्यंत | रुपये १,००,००० |
| १००१ ते २००० पर्यंत | रुपये २,००,००० |
| २००१ ते ३००० पर्यंत | रुपये ३,००,००० |
| ३००१ ते ४००० पर्यंत | रुपये ४,००,००० |
| ४००१ ते ५००० पर्यंत | रुपये ५,००,००० |
| ५००१ ते १०००० पर्यंत | रुपये ७,००,००० |
| १०००१ अथवा त्याहून अधिक | रुपये १०,००,०००. |

(२) १९० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना त्यांना मिळणाऱ्या पुरस्काराशिवाय मिळालेल्या पुरस्कार रकमेच्या २५% इतकी रक्कम विशिष्ट सन्मानचिन्हासह **"शांतता पुरस्कार"** म्हणून देण्यात येईल.

(३) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत पुरस्कार प्राप्त गावांना पुन्हा पुरस्कार अनुज्ञेय असणार नाही. तथापि, अशा गावांनी पुढील वर्षांमध्ये तंटे मिटविण्यामध्ये सातत्य राखल्यास **"विशेष पुरस्कार"** देण्याबाबत राज्यस्तरीय समिती विचार करेल. याबाबत स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

## १४. पुरस्कार रकमेचा विनियोग

तंटामुक्त गाव पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती ग्रामसभेच्या मान्यतेने पुरस्काराची रक्कम केवळ मत्ता उभारण्याबाबतच्या विकास कामासाठी खर्च करतील. याबाबत मार्गदर्शक सूचना **परिशिष्ट-७** प्रमाणे विहित करण्यात येत आहेत. या सूचना मोहिमेच्या प्रथम वर्षापासून लागू असतील.

## १५. प्रसिद्धीसाठी पुरस्कार

(१) समाजांत स्थायी व समतोल विकास साधावयाचा असेल तर सामाजिक शांतता व सुरक्षितता असणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठी निर्माण होणारे तंटे ग्रामपातळीवरच सामोपचाराने मिटवून व भविष्यात तंटे निर्माण होणार नाहीत असे वातावरण निर्माण करून लोकांनी स्थायी विकासाच्या

मार्गावरुन वाटचाल करावी असा मोहिमेचा असलेला व्यापक उद्देश सकारात्मक पत्रकारितेचा भाग म्हणून हा विचार, प्रसार माध्यमे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. त्यादृष्टीने मोहिम प्रभावी व यशस्वीरित्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेला वस्तुनिष्ठ प्रसिद्धी देणाऱ्या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना पुढीलप्रमाणे जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तर या प्रत्येक स्तरावर खालीलप्रमाणे तीन पुरस्कार देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हास्तरः | १) प्रथम पुरस्कार | रु. २५,०००/- |
| | २) द्वितीय पुरस्कार | रु. १५,०००/- |
| | ३) तृतीय पुरस्कार | रु. १०,०००/- |
| २) विभागीयस्तर : | १) प्रथम पुरस्कार | रु. १,००,०००/- |
| | २) द्वितीय पुरस्कार | रु. ७५,०००/- |
| | ३ ) तृतीय पुरस्कार | रु. ५०,०००/- |
| ३) राज्यस्तरः | १) प्रथम पुरस्कार | रु. २,५०,०००/- |
| | २) द्वितीय पुरस्कार | रु. १,५०,०००/- |
| | ३) तृतीय पुरस्कार | रु. १,००,०००/- |

२) वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर वरीलप्रमाणे प्रत्येक स्तरावर तीन पुरस्कार देण्याकरिता बातमीदारांची निवड करण्यासाठी जिल्हास्तर समिती, विभागीयस्तर समिती व राज्यस्तर समितीच्या रचना आणि बातमीदारांनी केलेल्या प्रसिद्धीच्या मूल्यमापनाचे निकष व देण्यात येणारे गुण या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-८** येथे विहित करण्यात येत आहेत.

३) जिल्हास्तर समिती, विभागीयस्तर समिती व राज्यस्तर समितीचे अध्यक्ष, निवड समित्यांचे गठण दरवर्षी दिनांक १५ मे पूर्वी करतील.

४) बातमीदारांनी **परिशिष्ट-८** मधील "अटी व शर्ती" मध्ये विहित केलेल्या कालावधीतील प्रसिद्ध केलेले साहित्य पुरस्कार पात्रतेकरिता मूल्यमापनार्थ ग्राह्य धरण्यात येईल.

५) **परिशिष्ट-८** च्या प्रपत्र-१ येथे पुरस्कारासाठी समित्यांकडे करावयाच्या अर्जाचा नमूना देण्यात आला आहे. त्या नमुन्यात बातमीदारांनी संबंधीत समितींच्या सदस्य सचिवांकडे विहित मुदतीत केलेले अर्जच विचारात घेण्यात येतील.

**१६. अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविणे**

अ) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत व्यापक लोकसहभाग अपेक्षित असून, मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रभावीपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, तालुकास्तरावरील समिती व पोलीस ठाणेस्तरावरील समिती या समित्यांमधील अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तंटामुक्त गाव समितीस येणाऱ्या सर्व अडचणीचे निराकरण करुन त्यांना त्यांच्या कार्यासाठी प्रोत्साहन द्यावयाचे आहे. तसेच विभागीय आयुक्त आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्रे) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात मोहिमेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेवून प्रभावी अंमलबजावणी करावयाची आहे. नेहमीच्या प्रशासकीय कामकाजापेक्षा या मोहिमेतील कामकाज हे

पोलीस ठाणे स्तरावरील तंटामुक्त गांव मोहीम समितीमध्ये घ्यावयाचे पोलीस पाटील, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक यांच्या प्रतिनिधींची निवड साधारणपणे संबंधित महसूल मंडळामधून एक प्रतिनिधी याप्रमाणे मंडळ अधिकारी/मंडळ निरीक्षक/बीट अंमलदार यांच्या सल्ल्याने करण्यात यावी. शक्यतोवर एकाच गावाचे दोन प्रतिनिधी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. समितीचे उर्वरित सदस्य पोलीस ठाणे प्रमुख यांनी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील त्या त्या प्रवर्गातील प्रभावी व्यक्तींच्यामधून निवड करावी.

या समितीने पोलीस ठाण्याच्या क्षेत्रातील सर्व गावांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मोहिमेची व्यापक प्रचार, प्रसिध्दी करावी. दर महिन्यामध्ये बैठक घेऊन प्रगतीचा आढावा घ्यावा. गावांना तंटामुक्तीसाठी सहकार्य होईल असे प्रबोधनात्मक कार्यक्रम पोलीस ठाणे स्तरावरुन आयोजित करावेत. पोलीस ठाणे कार्यक्षेत्रासाठी लोक न्यायालये, महसूल न्यायालये आयोजित करून अवघड दावे मिटविण्यास गावांना मदत करावी. पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त गावे तंटामुक्त होतील, असे प्रयत्न करावेत. तंटामुक्त पोलीस ठाणे असा गौरव प्राप्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न या समितीमार्फत करण्यात यावेत.

-०००-



४ १२७४–५

## परिशिष्ट-३

## मूल्यमापनाचे निकष व देण्यात येणारे गुण

**अ) प्रतिबंधात्मक उपाययोजना** **८० गुण**

खालीलप्रमाणे उपशिर्षानिहाय विविध उपक्रम राबविले असल्यास मूल्यमापन समिती त्या त्या समोर नमूद केल्याप्रमाणे त्या उपक्रमांना गुण देईल.

**(१) सार्वजनिक सण/उत्सव रचनात्मक पध्दतीने व शांततेने साजरे करणे;** **१० गुण**

- जयंती, उत्सव, गणेशोत्सव, इत्यादी समारंभ.
- गावातील सार्वजनिक उत्सव साजरे करणा-या मंडळांचे कार्यक्रम.
- उत्सवांमधून समाजोपयोगी उपक्रम राबविणे.
- व्याख्यानमाला, प्रशिक्षण शिबीर, इत्यादी आयोजित करणे.
- `एक गाव एक गणपती` यासारखे उपक्रम राबविणे.
- गावातील उत्सव/सण/यात्रा पोलीस बंदोबस्ताशिवाय शांततेत पार पाडणे.

**(२) जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणे;** **१० गुण**

- जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणारे उत्सव/सण एकत्रित येऊन साजरे करणे.
- आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहन देणे.
- मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांच्या तक्रारी मिटविणे.
- जातीय व धार्मिक सलोख्याचे कार्यक्रम घेणे.
- गावातील पुतळे व प्रार्थना स्थळे यांच्या देखभाल व संरक्षणासाठी उपाययोजना करणे.

**(३) सार्वजनिक व खाजगी मालमत्तांचे संरक्षण करणे व विद्रुपीकरण रोखणे;** **१० गुण**

- निवडणूक, वाढदिवस व इतर कार्यक्रम यांच्या जाहिरातीचे फलक लावण्यासाठी नियमावली करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
- जाहिरातीचे फलक न लावण्याबाबत सामंजस्याने अंमलबजावणी करणे.
- शासकीय व सार्वजनिक मिळकतीवर अतिक्रमणे होऊ न देणे.
- विद्रुप झालेल्या मालमत्ता पूर्ववत करणे.

**(४) ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करणे;** **१० गुण**

- ग्राम सुरक्षा दल स्थापन करणे.
- सदस्यांना गणवेश व प्रशिक्षण देणे.
- ग्राम सुरक्षा दलाची रात्रगस्त चालू करणे.

**(५) अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे;** **१५ गुण**

- गावातील अवैध धंदे रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- अवैध धंदे करणा-या लोकांना पर्यायी रोजगाराकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे.

- व्यसनमुक्तीसाठी कार्यक्रम राबविणे, व्यसनी लोकांचे समुपदेशन करणे.
- आवश्यकतेनुसार अवैध धंदे निर्मूलन व प्रतिबंध यासाठी पोलिसांची मदत घेणे वा या कामी पोलिसांना सहकार्य करणे.

**(६) सामाजिक सुरक्षिततेसाठी कार्यक्रम राबविणे;** **५ गुण**

- हुंडाबळी रोखणे.
- महिलांचे सामाजिक प्रश्न व कौटुंबिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.
- जेष्ठ नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकांसाठी प्रयत्न करणे.
- महिला बचत गट निर्मिती व सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे.
- सामूहिक विवाह सोहळे आयोजित करणे.
- गावामध्ये बालविवाह होणार नाहीत यासाठी प्रयत्न करणे.

**(७) गावांमध्ये राजकीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी उपक्रम घेणे;** **५ गुण**

- गावातील विविध कार्यकारी सोसायटी, ग्रामपंचायत व पतपेढ्या यांच्या निवडणुका बिनविरोधी होण्यासाठी प्रयत्न करणे.
- निवडणुका शांततेत पार पाडणे.

**(८) गावातील अनिष्ट प्रथा रोखणे;** **५ गुण**

- अनिष्ट प्रथा, चालीरीती रोखण्यासाठी प्रयत्न करणे.
- प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे.

**(९) वैयक्तिक समारंभ/कार्यक्रम/उत्सव;** **५ गुण**

- ध्वनीक्षेपकाचा नियमानुसार व मर्यादित वापर
- वरातीमधील गैरप्रकारांना प्रतिबंध करणे.
- वैयक्तिक समारंभातील अनिष्ट प्रथा नष्ट करणे.

**(१०) नाविण्यपूर्ण उपक्रम;** **५ गुण**

- गावातील स्त्री-पुरुष प्रमाण (जन्मदर) सुधारणे.
- बाल कामगार व बाल गुन्हेगारी रोखून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करणे.
- विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे.
- रस्ता सुरक्षेबद्दल उपाययोजना व प्रबोधन करणे.
- वन संवर्धन व वन संरक्षण याबाबत उपाययोजना करणे. गावाला व समितीला राबवावेत असे वाटणारे इतर उपक्रम.

**ब) तंटे मिटविणे**

दिनांक ३० सप्टेंबरपर्यंतचे दाखल तंटे आणि त्यानंतर दिनांक ३० एप्रिलपर्यंत नव्याने निर्माण झालेले तंटे असे सर्व तंटे मिटविण्यासाठी समितीने काम करावयाचे असून त्यानुसार तंटा मिटविण्याच्या केलेल्या कामांबद्दल खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

ज्या गावांनी मोहिमेत सहभाग घेतलेला आहे परंतु जी गावे पुरस्कारासाठी पात्र ठरलेली नाहीत त्या गावांच्या बाबतीत ती गावे मोहिमेत सहभागी झाल्यापासून, मोहिम अंमलबजावणी वर्षातील ३० सप्टेंबरपर्यंत नोंदविलेल्या एकूण तंटयांशी गावाने सुरवातीपासून ३० एप्रिलपर्यंत सोडविलेल्या तंटयांची टक्केवारी परिगणित करून गुणदान करावे.

**(१) दाखल असलेले तंटे मिटविणे** **एकूण गुण १००**

| अ.क्र. | तंटयाचा प्रकार | मिटविलेल्या तंटयांची टक्केवारी | देण्यात येणारे गुण |
|---|---|---|---|
| १ | दिवाणी | ९१ ते १०० | २५ |
| | | ७६ ते ९० | २० |
| | | ७० ते ७५ | १५ |
| | | ७० पेक्षा कमी | ० |
| २ | महसुली | ९१ ते १०० | ३५ |
| | | ८६ ते ९० | ३० |
| | | ८० ते ८५ | २५ |
| | | ८० पेक्षा कमी | ० |
| ३ | फौजदारी | ९१ ते १०० | ३५ |
| | | ८५ ते ९० | ३० |
| | | ८५ पेक्षा कमी | ० |
| ४ | इतर तंटे | ९१ ते १०० | ५ |
| | | ९० पेक्षा कमी | ० |

**(२) नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे** **एकूण गुण २०**

| अ.क्र. | तंटयाचा प्रकार | मिटविलेल्या तंटयांची टक्केवारी | देण्यात येणारे गुण |
|---|---|---|---|
| १ | दिवाणी | ९१-१०० | ५ |
| | | ७५-९० | ४ |
| | | ७५ पेक्षा कमी | ० |
| २ | महसुली | ९१-१०० | ५ |
| | | ८५-९० | ४ |
| | | ८५ पेक्षा कमी | ० |
| ३ | फौजदारी | ९१-१०० | ८ |
| | | ८५-९० | ६ |
| | | ८५ पेक्षा कमी | ० |
| ४ | इतर तंटे | ९१-१०० | २ |
| | | ८०-९० | १ |
| | | ८० पेक्षा कमी | ० |

फौजदारी तंटयाच्या बाबतीत तक्रार अर्ज, अदखलपात्र, दखलपात्र (compoundable) तंटे एकत्रित करुन त्याची टक्केवारी काढून गुण देण्यात यावेत.

## उदाहरण

गुणांच्या निकषांप्रमाणे **(अ) प्रतिबंधात्मक उपाययोजना** (कमाल ८० गुण) **(ब) ३० सप्टेंबरपर्यंत दाखल तंटे सोडवणूक** (कमाल १०० गुण) व **(क) ३० सप्टेंबरनंतरचे नवे तंटे मिटविणे** (२० गुण) या तिन्ही बाबींमध्ये स्वतंत्ररित्या **किमान ७०% गुण** (अनुक्रमे **अ-५६, ब-७०, क-१४**) प्राप्त झाल्याशिवाय आणि **एकत्रित एकूणपैकी किमान ७५% गुण** (२०० पैकी **किमान १५० गुण**) प्राप्त झाल्याशिवाय ग्रामपंचायत तंटामुक्त अभियानासाठी बक्षिसपात्र होत नाही. या बाबींचे सोदाहरण स्पष्टीकरण करण्यासाठी काही उदाहरणे नमूद करण्यात येत आहेत :---

| अ. क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | प्राप्त गुण | | | | बक्षिसा करिता पात्र/अपात्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल<br>किमान | अ<br>८० पैकी<br>**५६** | ब<br>१०० पैकी<br>**७०** | क<br>२० पैकी<br>**१४** | एकूण<br>२०० पैकी<br>**१४०** | | किमान गुणांची बेरीज १४० येत असली तरीही पात्रतेसाठी एकत्रित १५० गुण मिळणे आवश्यक राहील. |
| १ | **क** | ७५ | ८० | १८ | १७३ | पात्र | **अ,ब,क** मध्ये स्वतंत्ररित्या किमानपेक्षा जादा गुण व एकूणपैकी सुद्धा किमानपेक्षा जादा गुण बक्षिसास **पात्र.** |
| २ | **ख** | ५५ | **६५** | **१०** | **१३०** | अपात्र | **अ,ब,क** मध्ये स्वतंत्ररित्या किमानपेक्षा कमी. शिवाय एकूण मध्ये ही किमान आवश्यकतेपेक्षा कमी गुण प्राप्त बक्षिसास **अपात्र.** |
| ३ | **ग** | ७६ | ६८ | १५ | १५९ | अपात्र | **अ ब क** मध्ये किमान पात्रतेपेक्षा जादा व एकूण पैकीही किमान पात्रतेपेक्षा जादा गुण असले तरी **"ब"** मध्ये किमान पात्रतेपेक्षा कमी गुण असल्याने बक्षिसास **अपात्र.** |
| ४ | **घ** | ७८ | ९० | १० | १७८ | अपात्र | **अ व ब** मध्ये किमान पात्रतेपेक्षा जादा गुण, एकूण पैकी सुद्धा किमान पात्रतेपेक्षा जादा गुण. परंतु **"क"** मध्ये किमान पात्रतेपेक्षा कमी गुण मिळाल्याने बक्षिसास **अपात्र.** |
| ५ | **च** | ५० | ९५ | १७ | १६२ | अपात्र | **ब व क** एकूणमध्ये किमान पात्रतेपेक्षा जादा गुण. परंतु **"अ"** मध्ये किमान पाप्रतेपेक्षा कमी गुण मिळाल्यास बक्षिसास **अपात्र.** |
| ६ | **छ** | ५८ | ७२ | १६ | **१४६** | अपात्र | **अ,ब,क** मध्ये किमान पात्रते पेक्षा जादा गुण. परंतु एकूणमध्ये किमान पात्रतेपेक्षा कमी गुण. सबब बक्षिसास **अपात्र.** |
| ७ | **ज** | ७९ | ९६ | १९ | १९४ | पात्र | एकत्रित कमाल गुणांपैकी ९५% पेक्षा जास्त गुण (१९० पेक्षा जास्त गुण, पात्र) मिळाल्याने **२५%** जादा **बक्षिस रकमेसही पात्र.** |

# परिशिष्ट -४

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

## लोकन्यायालयाचा तंटे मिटविण्यासाठी सहभाग.

१. **लोक न्यायालयाविषयी संक्षिप्त माहिती**

(१) विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या कलम-१९ प्रमाणे प्रत्येक राज्य प्राधिकरणाला, उच्च न्यायालय विधी सेवा समितीला, जिल्हा प्राधिकरणास किंवा तालुका विधी सेवा समितीला योग्य वाटेल अशा कालांतराने व ठिकाणी लोकन्यायालये आयोजित करता येतील. **या कायद्याच्या कलम १९(५) प्रमाणे लोकन्यायालयामध्ये (i) कोणत्याही न्यायालयासमोर प्रलंबित असलेला दावा आणि (ii) कोणत्याही न्यायालयात दाखल केले नसलेले प्रकरण तडजोडीने मिटविता येते.** मात्र असा कोणताही तडजोडीने मिटविता न येण्याजोगा खटला अथवा प्रकरण (an offence not compoundable) लोक न्यायालयाच्या कक्षेत येत नाही.

या कायद्याच्या कलम २१ मधील तरतुदीनुसार लोकन्यायालयातील निवाडा हा अंतिम व वादातील सर्व पक्षकारांवर बंधनकारक असून, सदर निवाड्याच्या विरोधात कोणत्याही न्यायालयात अपील होऊ शकत नाही.

(२) लोकन्यायालयाच्या कामकाजाचे नियमन, महाराष्ट्र लोकन्यायालय नियम, १९८६ द्वारे करण्यात येत असून तंटे तडजोडीने मिटविण्यासंबंधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अनुषंगाने या नियमातील खालील तरतुदी महत्त्वाच्या आहेत:-

(i) न्यायालयामध्ये प्रलंबित नसलेल्या प्रकरणांसाठी उपरोक्त नियमांच्या नियम १०(१) अनुसार नमुना-अ मध्ये पक्षकारांनी तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावयाचे आहेत. नियम ५५ (१) अनुसार नमुना-ज मध्ये तडजोडनामा तयार करुन तो अर्जासोबत जोडावयाचा आहे.

(ii) विविध न्यायालयांसमोर प्रलंबित असलेले दावे आणि तंट्यांच्या बाबतीत नियम ११(२) अनुसार नमुना-इ मध्ये दोन्ही पक्षकारांनी तालुका विधि समितीकडे अर्ज करावयाचा आहे. नियम ५२ (१) अनुसार नमुना-एच मध्ये तडजोडनामा तयार करुन अर्जासोबत जोडावयाचा आहे.

(iii) तालुका विधि सेवा समितीकडे आलेल्या अर्जांचा विचार करुन दिनांक आणि ठिकाण निश्चित करुन लोक न्यायालय आयोजित करण्यात येते. तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज केलेल्या अर्जदारांना लोक न्यायालयामध्ये उपस्थित राहण्याबद्दल कळविण्यात येते. त्या दिवशी तडजोडीच्या सत्यतेची खात्री पटवून दिल्यानंतर लोक न्यायालयामध्ये हुकूमनामा अथवा आदेश पारित केले जातात.

(iv) विधी सेवा कायदा, १९८७ च्या कलम २(aaa) अनुसार न्यायालय म्हणजे दिवाणी, फौजदारी, महसुली न्यायालये आणि इतर न्यायाधिकरणे अथवा विविध कायद्यांतर्गत न्यायिक आणि अर्ध न्यायिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेले प्राधिकारी अशी न्यायालयाची व्याख्या केली आहे. या सर्व ठिकाणी प्रलंबित असलेल्या दाव्यांसंबंधी लोकन्यायालयामध्ये तडजोडी दाखल करुन हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत दिवाणी, फौजदारी, महसुली आणि इतर तंट्यांमध्ये झालेल्या तडजोडी लोक न्यायालयामध्ये दाखल करुन हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करुन घेता येतील.

२. **प्रशासनाने व महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीने करावयाची कार्यवाही**

(१) **जिल्हा प्रशासनाने करावयाची कार्यवाही:-** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश असून जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या बैठका आणि कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा. महात्मा गांधी तंटामुक्त गाव माहिमेअंतर्गत तडजोड झालेल्या तंट्यांच्या, दाव्यांच्या संकलित माहितीच्या आधारे जिल्हा पातळीवर आणि तालुका पातळीवर जास्तीत जास्त लोकन्यायालये आयोजित करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत प्रयत्न करावेत.

(२) **तालुका प्रशासनाने करावयाची कार्यवाही:-** तालुका पातळीवर तालुका विधी सेवा समिती निर्माण करण्यात आलेली असून तालुक्यातील वरिष्ठ न्यायिक अधिकारी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष आहेत. तहसीलदार आणि तालुक्यातील पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी यांनी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत गावनिहाय झालेल्या तडजोडीची संख्या विचारात घेऊन मुख्यालय, पोलीस ठाणेनिहाय अथवा महसुली मंडळनिहाय लोकन्यायालये आयोजित करण्यासाठी तालुका विधी सेवा समितीला विनंती करावी. एखाद्या गावामध्ये तडजोड झालेल्या दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्यास शक्य असेल तर अशा गावांमध्ये अथवा अशा गावांच्या जवळपासच्या गावांसाठी लोकन्यायालये आयोजित करण्याची तालुका विधी सेवा समितीला विनंती करावी.

**तडजोड झालेल्या तंट्यांमध्ये व दाव्यांमध्ये, तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करुन हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी तंटामुक्त गाव समित्यांना आणि तडजोडीमध्ये सहभागी झालेल्या पक्षकारांना आवाहन करण्यात यावे.**

(३) **तंटामुक्त गाव समितीने करावयाची कार्यवाही :-** तंटामुक्त गाव समितीने तडजोड झालेले दावे अथवा प्रकरणांमध्ये पक्षकारांना तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावयास सांगावे. अर्जाचे आणि तडजोडीचे नमुने उक्त परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या लोक न्यायालयाच्या नियमामध्ये दिलेल्या नमुन्याशी सुसंगत असे नमुने सोबत जोडले आहेत. लोकन्यायालय ज्यावेळी आयोजित केले जाईल, त्यावेळी ज्या पक्षकारांना तालुका विधी सेवा समितीची लोकन्यायालयामध्ये उपस्थित राहण्याची नोटीस आलेली असेल असे सर्व पक्षकार व साक्षीदार लोकन्यायालयामध्ये उपस्थित राहतील अशी खात्री तंटामुक्त गाव समितीने करावी.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद-७.२ च्या उप परिच्छेद-५.५ मध्ये तंटा/वाद मिटल्यानंतर संबंधीत पक्षकारांनी लेखी तडजोडनामा तयार करुन तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष आणि निमंत्रक यांच्या समक्ष स्वाक्ष-या कराव्यात तसेच अध्यक्ष व निमंत्रक यांनीही तडजोडनाम्यावर 'समोर' म्हणून स्वाक्षरी करावी अशी तरतूद केलेली आहे. यासंबंधी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:---

(अ) न्यायालयामध्ये प्रलंबित नसलेल्या प्रकरणांसाठी महाराष्ट्र लोकन्यायालय नियम, १९८६ चे नियम-१० (१) मधील अर्जाशी सुसंगत असा अर्जाचा नमुना आणि नियम ५५ (१) खालील नमुन्याशी सुसंगत असा तडजोडीचा नमुना अनुक्रमे प्रपत्र-(१) व प्रपत्र-(२) सोबत जोडला आहे. याप्रमाणे प्रकरण मिटल्यानंतर तडजोडनामा करुन लोकन्यायालयासाठी अर्ज करावा.

(ब) विविध न्यायालयासमोर प्रलंबित असलेले दावे आणि तंट्यांच्या बाबतीत नियम-११(२) मधील अर्जाशी सुसंगत असा अर्जाचा नमुना आणि त्यासोबत नियम ५२(१) खालील नमुन्याशी सुसंगत असा तडजोडीचा नमुना अनुक्रमे प्रपत्र-(३) व प्रपत्र-(४) सोबत जोडला आहे. याप्रमाणे प्रकरण मिटल्यानंतर तडजोडनामा करुन लोकन्यायालयासाठी अर्ज करावा.

वरील मार्गदर्शक सूचना व आदेश विचारात घेऊन जिल्हा व तालुका प्रशासकीय यंत्रणा आणि तंटामुक्त गाव समिती यांनी न्यायालयासमोर प्रलंबित असलेले दावे, न्यायालयासमोर दाखल अथवा प्रलंबित नसलेली प्रकरणे किंवा नव्याने निर्माण झालेले तंटे तडजोडीने मिटविल्यानंतर लोकन्यायालयातून हुकूमनामा अथवा आदेश प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

-------

# परिशिष्ट -५

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

## प्रपत्र - १

### न्यायालयात/प्राधिका-याकडे प्रलंबित नसलेल्या प्रकरणामध्ये लोक न्यायालयाकडे जाण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति
अध्यक्ष,
________ जिल्हा / तालुका विधी सहाय्य आणि सल्लागार समिती

महोदय,

मी, ________ वय ________ सध्या ________ येथे रहात असून सादर कळवतो/कळवते की, माझ्यात आणि माझे प्रतिपक्षी ________ यांच्यात न्यायालयात जाण्यापूर्वीचा विवाद आहे, आणि आगामी लोक न्यायालयाच्या सत्रासमोर सलोख्याच्या समझोत्यासाठी माझा विवाद आणण्याची माझी इच्छा आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत:---

१. अर्जदाराचे नाव आणि पत्ता :

२. प्रतिपक्षाचे नाव आणि पत्ता :

*३. थोडक्यात दाव्याची वस्तुस्थिती :

*(टीप : आवश्यकता असल्यास विवादाचे/दाव्याचे आणि/किंवा अधिकाराचे स्वरुप स्पष्ट करणारा वेगळा कागद जोडावा. तसेच त्यास पुष्टी देणाऱ्या दस्तऐवजांचा आणि संबंधित तपशिलाचा उल्लेख करावा.)

४. अर्जदाराचा दावा :

५. प्रतिपक्षाचे म्हणणे :

६) सदर प्रकरण कोणत्याही न्यायालयात दाखल केले आहे :
किंवा कसे, तसे असल्यास प्रकरणाच्या तपशिलांचा
आणि अवस्थेचा उल्लेख करावा :

७. सदर प्रकरण यापूर्वी कोणत्याही लोक न्यायालयासमोर आणले :
होते किंवा कसे, तसे असल्यास त्याचा निर्णय काय झाला होता.

८. अर्जदार सदर प्रकरणांचा सलोख्याने समझोता करण्यास तयार :
आहे किंवा कसे,

९. प्रतिपक्ष सदर प्रकरणांचा सलोख्याने समझोता करण्यास तयार :
आहे किंवा कसे.

१०. सदर प्रकरणाशी संबंधित इतर कोणत्याही बाबी. :

सदर अर्जाचा विचार करणे लोक न्यायालयाला शक्य होण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल अशी पुढील माहिती देण्याची माझी इच्छा आहे.

माझे प्रकरण दुसऱ्या बाजूच्या संमतीने सलोख्याच्या समझोत्यासाठी लोक न्यायालयासमोर देण्याची मी आपणांस विनंती करीत आहे की, ज्या दिवशी लोक न्यायालय भरेल त्या दिवशी मी लोक न्यायालयात उपस्थित राहीन असे मी आश्वासन देतो/देते.

माझ्या चांगल्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे वरील सर्व विधाने खरी आहेत.

दिनांक : आपला विश्वासू,

ठिकाण :

अर्जदाराची सही

----------

मी ______________________________ वय ______________________ सध्या ______________ येथे रहात असून वरील प्रकरणात प्रतिपक्ष असून सादर कळवतो की, माझ्यात आणि अर्जदार श्री/श्रीमती/कुमारी ______________ यांच्यात न्यायालयात जाण्यापूर्वीचा विवाद आहे. वर उल्लेखिलेली वस्तुस्थिती आणि तपशील खरे आणि अचूक आहेत. मी, याद्वारे उक्त तंटा सलोख्याच्या समझोत्यासाठी ज्या दिवशी लोक न्यायालय भरेल त्या दिवशी लोक न्यायालयासमोर आणण्यास सहमत आहे. त्या दिवशी मी लोक न्यायालयात उपस्थित राहीन, असे मी आश्वासन देतो.

( )

प्रतिपक्षाची सही

# परिशिष्ट -५

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

## प्रपत्र-२

### न्यायालयात/प्राधिका-याकडे प्रलंबित नसलेल्या प्रकरणामध्ये करावयाच्या तडजोडीचे ज्ञापन

प्रकरणाचा प्रकार :

श्री.______________________________ अर्जदार

विरुद्ध

श्री.______________________________ प्रतिपक्ष विवादाचे स्वरूप थोडक्यात असे आहे की, __________

आम्ही, म्हणजेच अर्जदार श्री.______________________ आणि प्रतिपक्ष श्री.______________________ वरील प्रकरणाचा समझोता करण्यासाठी खालीलप्रमाणे तडजोडीवर आलेलो आहोत :---

तडजोडीच्या अटी -

आम्ही स्वेच्छेने तडजोड करीत असून आमच्यावर तडजोडीच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तींकडून जबरदस्ती आणि बळजबरी करण्यात आली नाही. आम्ही याद्वारे वर उल्लेख केलेल्या तडजोडींच्या अटी स्वीकारत असून त्यांचे पालन करणार आहोत ; आणि वरील तडजोडीनुसार अंतिमत: प्रकरणाचा समझोता झाला असे मान्य करीत आहोत.

दिनांक :

ठिकाण :

( )
अर्जदाराची सही

( )
प्रतिपक्षाची सही

( )
अर्जदारासाठी साक्षीदाराची सही

( )
प्रतिपक्षासाठी साक्षीदाराची सही

दिनांक :

ठिकाण :

दिनांक :

ठिकाण :

सदर प्रकरणाचा ____________________ येथे दिनांक ____________ या दिवशी सामोपचाराने तडजोडनामा करण्यात आला आहे.

अध्यक्ष,
तंटामुक्त गाव समिती.

निमंत्रक,
तंटामुक्त गाव समिती.



२७४–६अ

# परिशिष्ट -५

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

## प्रपत्र -३

### न्यायालयात/प्राधिका-याकडे प्रलंबित असलेल्या दाव्यासंबंधी दोन्ही पक्षांकडून लोक न्यायालयाकडे करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,
अध्यक्ष,
______________________ समिती

महोदय,

मी _______________________________________________वय सध्या _______________________________________ येथे रहात असून, सादर कळवतो की, मी आणि श्री. ________________________________________ यांच्यात प्रलंबित विवाद प्रकरण आहे आणि आगामी लोक न्यायालयाच्या सत्रासमोर सलोख्याच्या समझोत्यासाठी उक्त प्रकरण आणण्याची माझी इच्छा आहे. त्याचा तपशील खाली दिलेला आहे :-

१) अर्जदाराचे / वादीचे नाव आणि पत्ता :

२) प्रतिपक्षाचे / प्रतिवादीचे नाव आणि पत्ता :

*३) प्रकरणाची थोडक्यात वस्तुस्थिती :

४) प्रकरणाचा किंवा विवादाचा क्रमांक आणि दिनांक :

५) ज्या न्यायालयात प्रलंबित आहे त्याचे नाव :

६) न्यायालयात कोणत्या तारखेपासून प्रकरण किंवा : विवाद प्रलंबित आहे ती तारीख

७) वादीचा दावा :

* **(टीप.**---(एक) जर आवश्यकता असेल तर विवादाचे, दाव्याचे आणि अधिकाराचे स्वरूप स्पष्ट करणारा स्वतंत्र कागद जोडावा आणि त्यास पुष्टी देणाऱ्या आणि इतर सबंध तपशीलांचा उल्लेख करावा.

(दोन) मालमत्तेच्या संबंधात, जमीन, महसूल बाबी, सर्वेक्षण क्रमांक, हिस्सा क्रमांक, हद्दीचा तपशील देण्यात यावा.

८) प्रतिवादीचे म्हणणे :

९) जर विवाद शासनाशी असेल तर प्रश्न कोणत्या विभागाशी संबंधित आहे त्याचा उल्लेख करावा. :

१०) सदर प्रकरण यापूर्वी लोक न्यायालयासमोर आले होते किंवा कसे ? तसे असल्याचा त्याचा निर्णय काय लागला होता. :

११) अर्जदार सदर प्रकरणाचा सलोख्याने समझोता करण्यास तयार आहे किंवा कसे. :

१२) प्रतिवादी सदर प्रकरणाचा सलोख्याने समझोता करण्यात तयार आहे किंवा कसे. :

१३) यासाठी वकिलांची मदत घेतली असल्यास, त्यांची नावे :

१४) सदर प्रकरणाशी संबंध असलेल्या इतर गोष्टी :

१५) शेरा ________ ________ ________

सदर अर्जाचा विचार करणे लोक न्यायालयाला शक्य व्हावे यासाठी आवश्यक असेल अशी पुढील माहिती देण्याची माझी इच्छा आहे.

माझे उपरोल्लेखित प्रकरण दुसऱ्या बाजुच्या संमतीने सलोख्याच्या समझोत्यासाठी घेण्याची मी आपणांस विनंती करीत आहे.

मी असेही आश्वासन देतो / देते की, ज्या दिवशी लोकन्यायालय भरेल त्या दिवशी मी लोक न्यायालयात उपस्थित राहीन.

माझ्या व्यक्तिगत चांगल्या माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे वरील सर्व विधाने खरी आहेत.

आपला विश्वासू,

दिनांक :

ठिकाण :

वादीची सही

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराच्या / वादीच्या
वकिलाची सही

# परिशिष्ट -५

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

### प्रपत्र -४

**न्यायालयात/प्राधिका-याकडे प्रलंबित असलेल्या दाव्यामध्ये करावयाच्या तडजोडीचे ज्ञापन**

प्रकरणाचा प्रकार :

मौजे ______________ येथील ________________ न्यायालयात/प्राधिका-याकडे प्रलंबित असलेला दावा/ प्रकरण क्रमांक ____________ दिनांक____________
श्री.____________________________________________________ वादी / अर्जदार.

माननीय महोदय,

विवादाचे स्वरूप थोडक्यात असे आहे की__________________________________

आम्ही, म्हणजे श्री.________________________________________वादी/अर्जदार आणि ________________________________प्रतिवादी खालीलप्रमाणे तडजोडीवर आलो आहोत.

तडजोडीच्या अटी-

दिनांक ________________ या दिवशी वरील तडजोडनामा आम्ही स्वेच्छेने केला असून आमच्यावर जबरदस्ती किंवा बळजबरी करण्यात आली नाही. आम्ही सदर तडजोड आजच अभिलिखित करण्याची न्यायालयाला/प्राधिकायाला/तंटामुक्त गाव समितीला विनंती करीत आहोत आणि तद्नुसार वरील प्रकरणाचा समझोता झाला अशी नोंद करण्यात यावी.

दिनांक :

ठिकाण :

( )
वादीची / अर्जदाराची सही

( )
प्रतिवादीची/प्रतिपक्षाची सही

( )
वादीसाठी साक्षीदाराची सही

( )
प्रतिवादीसाठी साक्षीदाराची सही

सदर प्रकरणाचा मौजे ____________ येथे दिनांक ____________ या दिवशी सामोपचाराने तडजोडनामा करण्यात आला आहे.

अध्यक्ष
तंटामुक्त गाव समिती

निमंत्रक
तंटामुक्त गाव समिती

## परिशिष्ट-६

### प्रपत्र-१

### गावाने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा मूल्यमापन अहवाल

(स्वयं मूल्यमापन / जिल्हा मूल्यमापन / जिल्हाबाह्य मूल्यमापन)

गावाचे नाव -------------- पोलीस ठाणे ------- तालुका ------- जिल्हा ------------

लोकसंख्या ------------(सन २००१ जनगणनेनुसार)

जिल्हा बाह्य मूल्यमापन समिती ज्या जिल्ह्याची आहे त्या जिल्ह्याचे नाव :-

| अ.क्र. | प्रतिबंधात्मक उपाययोजना | विहित कमाल गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| ०१ | **सार्वजनिक सण/उत्सव रचनात्मक पध्दतीने व शांततेने साजरे करणे** | **१०** | |
| | जयंती, उत्सव, गणेशोत्सव, इ.समारंभ | २ | |
| | गांवातील सार्वजनिकरित्या उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांचे कार्यक्रम | १ | |
| | उत्सवांमधून समाजोपयोगी उपक्रम राबविणे | २ | |
| | व्याख्यानमाला, प्रशिक्षण शिबीर इत्यादी आयोजित करणे | २ | |
| | `एक गांव एक गणपती` यासारखे उपक्रम राबविणे | १ | |
| | गांवातील उत्सव/सण पोलीस बंदोबस्ताशिवाय पार पाडणे | २ | |
| ०२ | **जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणे** | **१०** | |
| | जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणारे उत्सव/सण एकत्रित येऊन साजरे करणे | २ | |
| | आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहासाठी ग्रामस्थांना प्रोत्साहन देणे | २ | |
| | मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांच्या तक्रारी मिटविणे | २ | |
| | जातीय व धार्मिक सलोख्याचे कार्यक्रम घेणे | २ | |
| | गावातील पुतळे व प्रार्थनास्थळे यांच्या देखभाल व संरक्षणासाठी उपाययोजना करणे | २ | |
| ०३ | **सार्वजनिक व खाजगी मालमत्तांचे संरक्षण करणे व विद्रुपीकरण रोखणे** | **१०** | |
| | निवडणूक, वाढदिवस व इतर कार्यक्रम यांच्या जाहिरातीचे फलक लावण्यासाठी नियमावली करणे व त्यांची अंमलबजावणी करणे | ३ | |
| | जाहिरातीचे फलक न लावण्याबाबत सामंजस्याने अंमलबजावणी करणे | २ | |
| | शासकीय व सार्वजनिक मिळकतीवर अतिक्रमणे होऊ न देणे | ३ | |
| | विद्रूप झालेल्या मालमत्ता पूर्ववत करणे | २ | |
| ०४ | **ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यरत करणे** | **१०** | |
| | ग्राम सुरक्षा दल स्थापन करणे | ३ | |
| | सदस्यांना गणवेश व प्रशिक्षण देणे | ३ | |
| | ग्राम सुरक्षा दलाची रात्रगस्त चालू करणे | ४ | |
| ०५ | **अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मूलन करणे** | **१५** | |
| | गांवातील अवैध धंदे रोखण्यासाठी प्रयत्न करणे | ५ | |
| | अवैध धंदे करणा-या लोकांना पर्यायी रोजगाराकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे | ३ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | व्यसनमुक्तीसाठी कार्यक्रम राबविणे, व्यसनी लोकांचे समुपदेशन करणे | ३ | |
| | आवश्यकतेनुसार अवैध धंदे निर्मूलन व प्रतिबंध यासाठी पोलिसांची मदत घेणे वा या कामी पोलिसांना सहकार्य करणे | ४ | |
| ०६ | **सामाजिक सुरक्षा निर्मितीसाठी कार्यक्रम राबविणे** | **०५** | |
| | हुंडाबळी रोखणे | १ | |
| | महिलांचे सामाजिक प्रश्न व कौटुंबिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे | १/२ | |
| | जेष्ठ नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे | १/२ | |
| | महिला बचत गट निर्मिती व सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे | १ | |
| | सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणे | १ | |
| | गावामध्ये बालविवाह होणार नाहीत यासाठी प्रयत्न करणे | १ | |
| ०७ | **गावामध्ये राजकीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी उपक्रम घेणे** | **०५** | |
| | गावातील विविध कार्यकारी सोसायट्या, ग्रामपंचायत व पतपेढ्या यांच्या निवडणूका बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करणे | ३ | |
| | निवडणुका शांततेत पार पाडणे | २ | |
| ०८ | **गांवातील अनिष्ट प्रथा रोखणे** | **०५** | |
| | अनिष्ट प्रथा, चालीरिती रोखण्यासाठी प्रयत्न करणे | ३ | |
| | प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे | २ | |
| ०९ | **वैयक्तिक समारंभ/कार्यक्रम/उत्सव** | **०५** | |
| | ध्वनीक्षेपकाचा नियमानुसार व मर्यादित वापर | १ | |
| | वरातीमधील गैरप्रकारांना प्रतिबंध करणे | २ | |
| | वैयक्तिक समारंभातील अनिष्ट प्रथा नष्ट करणे | २ | |
| १० | **नाविन्यपूर्ण उपक्रम** | **०५** | |
| | गावातील स्त्री-पुरुष प्रमाण (जन्मदर) सुधारणे | १ | |
| | बाल कामगार व बाल गुन्हेगारी रोखून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न करणे | १ | |
| | विधवा,परित्यक्ता महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे | १/२ | |
| | रस्ता सुरक्षा बद्दल उपाययोजना व प्रबोधन करणे | १/२ | |
| | वन संवर्धन व वन संरक्षण याबाबत उपाययोजना करणे | १ | |
| | गावाला व समितीला राबवावेत असे वाटणारे इतर उपक्रम | १ | |
| | **एकूण** | **८०** | |

**सही** **सही**

**सही** **सही**

**टीप:** १. तंटामुक्त गाव समितीचा स्वयंमूल्यमापन अहवाल अध्यक्ष व निमंत्रक यांनी स्वाक्षरीत करावा.

२. जिल्हा मूल्यमापन समितीच्या मूल्यमापन अहवालावर अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी स्वाक्षरी करावी.

३.जिल्हा बाह्य मूल्यमापन समितीचे मूल्यमापन अहवालावर अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी ज्या जिल्हयाची समिती आहे त्या जिल्हयाचे नाव लिहून स्वाक्षरी करावी.



१२७४ — ७

## परिशिष्ट - ६

## प्रपत्र-२

## मिटविलेल्या तंट्यांचा मूल्यमापन अहवाल

## (स्वयं/जिल्हा/जिल्हाबाह्य मूल्यमापन) *

**गावाचे नाव** -------------------- **पोलीस ठाणे** ---------------------- **तालुका** ----------- **जिल्हा** ------

**जिल्हा बाहय मूल्यमापन समिती ज्या जिल्हयाची आहे त्या जिल्हयाचे नाव :**

**लोकसंख्या** ----------------------- (सन २००१ च्या जनगणनेनुसार)

| अ. क्र. | तालुका | पोलीस ठाणे | गावाचे नांव | लोकसंख्या | नोंदवही क्रमांक | नोंदवहीचा विषय | नोंदवहीत नोंदविण्यात आलेले तंटे | मिटविलेले तंटे | मिटविलेल्या तंट्यांची नोंदविलेल्या तंटयांशी टक्कवारी | तंटामुक्ती-साठी विहित केलेली टक्केवारी | मूल्य-मापनातील गुण स्वयं/जिल्हा/ बाह्य | पुरस्कारा-साठी आवश्यक गुण | पुरस्कारा-साठी पात्र/ अपात्र | विशेष पुरस्कारा-साठी पात्र/ अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| | | | | | | **अ) दाखल तंटे मिटविणे** | | | | | | | | |
| | | | | | | १. दिवाणी | | | | | | | | |
| | | | | | | २. महसुली | | | | | | | | |
| | | | | | | ३. फौजदारी | | | | | | | | |
| | | | | | | ४. इतर | | | | | | | | |
| | | | | | | एकूण : | | | | | | | | |
| | | | | | | **ब) नव्याने निर्माण होणारे तंटे** | | | | | | | | |
| | | | | | | १. दिवाणी | | | | | | | | |
| | | | | | | २. महसुली | | | | | | | | |
| | | | | | | ३. फौजदारी | | | | | | | | |
| | | | | | | ४. इतर | | | | | | | | |
| | | | | | | **एकूण :** | | | | | | | | |

**टीपः-** १. तंटामुक्त गाव समितीचा स्वयंमूल्यमापन अहवाल अध्यक्ष व निमंत्रक यांनी स्वाक्षरीत करावा.

२. जिल्हा मूल्यमापन समितीच्या मूल्यमापन अहवालावर अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी स्वाक्षरी करावी.

३. जिल्हा बाह्य मूल्यमापन समितीचे मूल्यमापन अहवालावर अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी ज्या जिल्हयाची समिती आहे त्या जिल्हयाचे नाव लिहून स्वाक्षरी करावी.

च १२७४ – ८

## परिशिष्ट - ६

### प्रपत्र-३

### प्रतिबंधात्मक उपाययोजना व मिटविलेल्या तंट्यांच्या मूल्यमापनाचा एकत्रित अहवाल

(स्वयं/जिल्हा/जिल्हाबाह्य मूल्यमापन)

गावाचे नांव ---------------- पोलीस ठाणे ---------------- तालुका ---------------- जिल्हा --------

लोकसंख्या ------------------------ (सन २००१ च्या जनगणनेनुसार) **जिल्हाबाहय मूल्यमापन समिती ज्या जिल्हयाची आहे त्या जिल्हयाचे नाव :-**

| अ. क्र. | तालुका | पोलीस ठाणे | गावाचे नांव | लोकसंख्या | मूल्यमापनात मिळालेले गुण | | | | पुरस्कारासाठी | विशेष पुरस्कारासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना साठी (८० पैकी) | दाखल तंटे मिटविण्यासाठी (१०० पैकी ) | नव्याने निर्माण झालेले तंटें मिटविण्यासाठी (२० पैकी) | एकूण प्राप्त गुण (२०० पैकी) (६+७+८) | पात्र/अपात्र (किमान १५० गुण) | पात्र/अपात्र (किमान १९० गुण) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | |

टीप: १. तंटामुक्त गाव समितीचा स्वयंमूल्यमापन अहवाल अध्यक्ष व निमंत्रक यांनी स्वाक्षरीत करावा.

२. जिल्हा मूल्यमापन समितीच्या मूल्यमापन अहवालावर अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी स्वाक्षरी करावी.

३. जिल्हा बाह्य मूल्यमापन समितीचे मूल्यमापन अहवालावर अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी ज्या जिल्हयाची समिती आहे त्या जिल्हयाचे नाव लिहून स्वाक्षरी करावी.

## परिशिष्ट ६

## प्रपत्र-४

# शासनास पाठवावयाचा जिल्हा मूल्यमापनाचा अहवाल

जिल्ह्याचे नाव ----------- विभागाचे नाव --------------- परिक्षेत्राचे नाव ----------

| अ. क्र. | तालुका | पोलीस ठाणे | गावाचे नांव | लोकसंख्या | जिल्हा मूल्यमापनात मिळालेले गुण | | | | पुरस्कारासाठी | विशेष पुरस्कारासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी (८० पैकी) | दाखल तंटे मिटविण्यासाठी (१०० पैकी) | नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविण्यासाठी (२० पैकी) | एकूण प्राप्त गुण (२०० पैकी) | पात्र/अपात्र (किमान गुण १५०) | पात्र/ अपात्र (किमान गुण १९०) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१४) | (१५) |
| | | | | | | | | | | |

सही
पोलीस अधीक्षक

सही
जिल्हाधिकारी

# परिशिष्ट ६

## प्रपत्र ५

## शासनास पाठवावयाचा जिल्हाबाह्य मूल्यमापनाचा अहवाल

जिल्ह्याचे नाव -------------- विभागाचे नाव ----------------------- परिक्षेत्राचे नाव - ----------------

**जिल्हाबाहय मूल्यमापन समिती ज्या जिल्ह्याची आहे त्या जिल्ह्याचे नाव ------------------**

| अ. क्र. | तालुका | पोलीस ठाणे | गावाचे नांव | लोकसंख्या | जिल्हा मूल्यमापनात मिळालेले गुण | | | | पुरस्कारा-साठी | विशेष पुरस्कारासाठी | जिल्हाबाह्य मूल्यमापनात मिळालेले गुण | | | | पुरस्कारासाठी | विशेष पुरस्कारासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रतिबंधात्मक उपाययोजना-साठी (८० पैकी) | दाखल तंटे मिटविण्यासाठी (१०० पैकी) | नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविण्या-साठी (२० पैकी) | एकूण प्राप्त गुण (२०० पैकी) | पात्र/अपात्र (किमान गुण १५०) | पात्र/ अपात्र (किमान १९० गुण ) | प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी (८० पैकी) | दाखल तंटे मिटविण्यासाठी (१०० पैकी) | नव्याने निर्माण झालेले तंटे मिटविण्यासाठी (२० पैकी) | एकूण प्राप्त गुण (२०० पैकी) | पात्र/अपात्र (किमान १५० गुण) | पात्र/ अपात्र (किमान १९० गुण ) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
| | | | | | | | | | | | | | | | | |

**सही**
**पोलीस अधीक्षक.**

**सही**
**जिल्हाधिकारी.**

परिशिष्ट ६

प्रपत्र ६

## दखलपात्र फौजदारी (Non-Compoundable) तंट्यांसंबंधीची माहिती

| अ.क्र. | नोंदवही क्र. | तक्रादाराचे नाव / नावे | प्रतिवादीचे नाव /नावे | तंटा / दावा प्रलंबित आहे ते न्यायालय/ प्राधिकरण | दावा क्रमांक आणि संबंधित कायदा व त्याची कलमे | तंट्यांचे थोडक्यात स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |
| | | | | | | |

# परिशिष्ट ७

## पुरस्कार रकमेचा विनियोग

१. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमे अंतर्गत तंटामुक्त गाव पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना पुरस्कार रकमेच्या विनियोगाबाबत शासन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देत आहे :---

१) पुरस्काराच्या रक्कमेतून विविध उपक्रमासाठी खर्च करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला पुढील सर्वसाधारण सूचनांचे अधीन असतील. याबाबत ग्रामसभेत पुरस्कार रकमेच्या विनियोगाबाबत निर्णय घेण्यात येईल.

२) पुरस्काराच्या रक्कमेपैकी कमाल २ टक्के पर्यंत रक्कम पुरस्कार समारंभासाठी अनुषंगिक बाबींवर खर्च करता येईल.

३) एकूण पुरस्कार रक्कमेच्या १५ टक्के पर्यंत रक्कम ग्रामसभेच्या निर्णयानुसार महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहीमेच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी खर्च करता येईल.

४) पुरस्काराच्या एकूण रक्कमेच्या ५ टक्के पर्यंत खर्च महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रशासकीय व कार्यालयीन बाबींसाठी ग्रामसभेच्या निर्णयानुसार करता येईल.

५) पुरस्कार रक्कमेच्या कमाल १५ टक्के पर्यंत खर्च ग्रामपंचायतीतील रहिवाशी असलेल्या विद्यार्थी, युवक, महिला, महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहीमेचे उत्कृष्ट काम करणारे ग्रामस्थ, इत्यादी यांचेसाठी वैयक्तीक लाभाच्या खालील योजनांवर करण्याचा निर्णय ग्रामसभा घेऊ शकेल. पुढील योजनांमध्ये प्रत्येकी देण्यात येणाऱ्या रकमेची उच्चतम मर्यादा विहित केली आहे. बक्षिस रकमेच्या व लाभार्थी संख्येच्या अनुषंगाने विहित मर्यादेपेक्षा कमी रकमांची पारितोषिके देता येतील असे करताना एकूण बक्षिस रकमेच्या १५ टक्के ची मर्यादा ओलांडता येणार नाही.

(अ) गावातील इयत्ता दहावी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी दारिद्ररेषेखालील कुटुंबातील उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी प्रोत्साहन मिळावे म्हणून प्रत्येकी रुपये ५०० पर्यन्त सानुग्रह अनुदान देण्यात येईल.

(ब) मोहिम अंमलबजावणी वर्षात गावातील ज्या मातांनी मुलींना जन्म दिला आहे त्यांना **कन्यारत्न जन्मांनंद भेट** म्हणून आणि गावातील ज्या मुली सासरी गेलेल्या असतील व त्यांनी मुलीला जन्म दिला असेल अशा सर्व मातांना **माहेर भेट** म्हणून प्रत्येकी रुपये ५०० पर्यन्त रक्कम प्रदान करण्यात येईल.

(क) गावातील ज्या व्यक्तींनी स्वतःला व्यसनमुक्त केले आहे आणि व्यसनमुक्त होऊन सहा महिने पूर्ण झालेले आहेत अशा व्यक्तींना प्रत्येकी रुपये ३०० पर्यन्त प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येईल.

(ख) गावातील जे युवक तालुकास्तर, जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर क्रीडा, कला, संगीत व साहित्य या क्षेत्रात नैपुण्य प्राप्त करतील व या विविध स्तरावर होणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी होतील त्यांना रुपये ५०० पर्यन्त पारितोषिक देण्यात येईल. या पारितोषिकांची एकूण संख्या दहापेक्षा अधिक असणार नाही.

(ग) गावातील महिला बचत गटात ज्या महिला सर्वोत्कृष्ट कार्य करतील अशा तीन महिलांची निवड ग्रामसभा करील व त्यांना रुपये ५०० पर्यन्त पारितोषिक देण्यात येईल.

(घ) गावात तंटे निर्माण होणार नाहीत व दाखल तंटे सामोपचाराने मिटविण्यासाठी सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या गावातील पाच पर्यत व्यक्तींची निवड ग्रामसभा करील आणि त्यांना रुपये ५०० पर्यन्त पारितोषिक देण्यात येईल.

६) पारितोषिकाची उर्वरित रक्कम ग्रामसभेच्या मान्यतेने खालील प्रयोजनार्थ खर्च करता येईल,---

(अ) गावाच्या परिक्षेत्रात गायरान व सरकारी जमिनीवर वृक्षारोपण करणे,---

पिंपळ, वड, उंबर, चिंच, लिंब, पिंपरी, जांभूळ, आंबा, कवठ, साग, इत्यादी दीर्घायुषी व अल्प पर्जन्यमान असलेल्या भागातही वाढणाऱ्या झाडांची प्रामुख्याने लागवड करून त्यांचे संगोपन करणे.

(ब) गावाच्या परिक्षेत्रातील पर्यावरण रक्षण / संरक्षण करणे.

(क) गावाच्या परिक्षेत्रातील जलस्त्रोतांचे संरक्षण, शुद्धिकरण व अभिवर्धन करणे.

(ड) गावासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी, गावतळी यातील गाळ उपसून जलसाठयात अभिवृद्धि करणे.

(इ) गावातील रस्त्यांवर सौरउर्जेच्या माध्यमातून प्रकाश व्यवस्था निर्माण करणे.

(ई) गावातील सर्व पशूधनाचे लसीकरण, आरोग्यतपासणी व रोगप्रतिबंधक उपाययोजना करणे.



शा.म.मु.) एच १२७४ — ९ (४५,०००—८-२००८)

(य) गावातील जैववैविधतेनुसार वेगवेगळया अन्नधान्यांच्या बी-वियाणांची निर्मीती, वाणांचे जतन व संवर्धन करणे.
(र) गावाच्या प्राकृतिक सौदर्याचे जतन व संवर्धन करणे.
(ल) गावाच्या परिक्षेत्रातून जाणा-या ओढे/नदीपात्राचे अतिक्रमण हटवून ओढे/नदीचे शुद्धिकरण करणे.
(व) गावातील सर्व नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे.
(श) गावात स्थापित ग्राम सुरक्षा दलासाठी गणवेश पुरविणे.
(ष) गावातील/शाळेतील वाचनालयासाठी रुपये ५००० इतक्या रकमेपर्यंतची उपयुक्त संदर्भग्रंथ/पुस्तके यांची खरेदी करणे. यात प्रामुख्याने मराठी विश्वकोषाची खरेदी करण्यात येईल.
(ह) गावातील जलनिकास व्यवस्था (ड्रेनेज), (अंतर्गत व रस्त्याच्या बाजूची) कचराकुंडया, सार्वजनिक शौचालये, शाळाखोल्या, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत इमारती, चावड्या यांच्या देखभाल व दुरुस्तीवर खर्च करता येईल.

२. ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची आणि ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करून त्यांचे हिशोब ठेवणे व ग्रामसभेला अहवाल सादर करणे आणि संबंधित शासकीय यंत्रणाना याबाबत आवश्यक ती माहिती पुरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या ग्राम सेवकामार्फत तंटामुक्त गाव समितीची राहील.

३. जिल्हास्तरीस कार्यकारी समिती सदर सूचना, पुरस्कार मिळविणाऱ्या ग्रामपंचायतीच्या वेळोवेळी निदर्शनास आणेल. तसेच या सूचनांनुसार ग्रामपंचायतीकडून होत असलेल्या खर्चाची कालबध्द तपासणी संबंधित तहसिलदार, गट विकास अधिकारी, संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस प्रमुख आणि पुरस्कार रकमेचा विहित सूचनांनुसार विनियोग होईल याबाबत संबंधित तालुका समिती नियंत्रण ठेवील. ज्या प्रकरणात या सूचनांचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून येईल त्या प्रकरणात संबंधितांवर आवश्यक ती कारवाई तालुका स्तरीय समितीच्या शिफारशीवर जिल्हास्तरीय कार्यकारी समिती करील. ग्रामपंचायतीच्या लेखा परिक्षणाबरोबर पुरस्कार निधीचे लेखा परिक्षण होईल.

४. संबंधित तहसिलदार, गट विकास अधिकारी, संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस प्रमुख, संबंधित ग्रामसेवक हे बक्षिसपात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेस हजर राहून पारितोषिक रकमेच्या विनियोगाबाबत सदर शासन निर्णयातील सूचना सर्वांना समजतील अशा प्रकारे वाचून दाखवतील व याबाबत योग्य ते मार्गदर्शन करतील.

# परिशिष्ट ८

वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर पुरस्कारासाठी उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्याकरिता समित्या, पात्रता, अटी व निवडीबाबतचे निकष.

१. **निवड समित्या :---**

**(अ) जिल्हा स्तर**

१. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
२. जिल्हा पोलीस अधीक्षक - सदस्य
३. जिल्हा माहिती अधिकारी - सदस्य सचिव
४. अध्यक्ष, जिल्हा पत्रकार संघ - सदस्य
५. जिल्ह्यातील सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्राचे संपादक - सदस्य
६. एका स्वयंसेवी संस्थेची महिला प्रतिनिधी - सदस्या.

**(ब) विभागीय स्तर**

१. विभागीय आयुक्त (महसूल) - अध्यक्ष
२. विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्र)
३. उप संचालक, माहिती व जनसंपर्क - सदस्य सचिव
४. विभागातील सर्वाधिक खपाच्या दोन दैनिकांचे संपादक
५. एका स्वयंसेवी संस्थेची महिला प्रतिनिधी - सदस्या.

**(क) राज्यस्तर**

१. मा.उपमुख्यमंत्री (गृह) - अध्यक्ष
२. मा.राज्यमंत्री (गृह) - सदस्य
३. अपर मुख्य सचिव (गृह) - सदस्य
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य - सदस्य
५. प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग - सदस्य
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - सदस्य
७. उप / सह सचिव, गृह विभाग - सदस्य सचिव
८. मराठी पत्रकार परिषदेचा प्रतिनिधी - सदस्य
९. अध्यक्ष, मंत्रालय व विधीमंडळ वार्ताहर संघ - सदस्य
१०. राज्यातील मराठी, हिन्दी व इंग्रजी वृत्तपत्राचे प्रत्येकी एक संपादक - तीन सदस्य

## २. पुरस्कार पात्रतेसाठीच्या अटी :-

१) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या प्रसिद्धीसाठी, बातमीदारांनी प्रतिवर्षी २ मे ते पुढील वर्षातील १ मे या कालावधीत प्रसिद्ध केलेले साहित्य पुरस्कार पात्रतेकरिता मूल्यमापनार्थ ग्राह्य धरण्यात येईल.

२) पुरस्कारांसाठी उक्त कालावधीत वृत्तपत्रे / नियतकालीके यामधून प्रसिद्ध झालेले टीकात्मक लेख, वृत्तांकन, बातम्या, अग्रलेख, फोटोफिचर्स, अशा साहित्याचा विचार करण्यात येईल.

३) पुरस्कारासाठी वृत्तपत्रांचे बातमीदार, स्तंभलेखक, मुक्तपत्रकार पात्र असतील.

४) पारितोषिकांसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत प्रसिध्द केलेल्या साहित्याचा विचार करण्यात येईल.

५) उमेदवारास ज्या स्तरावरील पारितोषिकासाठी अर्ज करावयाचा आहे त्या स्तरावरील समितीच्या सदस्य सचिवाकडे अर्ज करता येईल. मात्र कोणत्याही एका पारितोषिकासाठीच अर्ज करता येईल.

६) पारितोषिकासाठी विहित मुदतीत वैयक्तिक केलेले अर्ज विचारात घेण्यात येतील. एका वर्तमानपत्राच्या प्रत्येक आवृत्तीच्या एकाच पत्रकारांचा अर्ज संपादकामार्फत स्वीकारण्यात येईल. जर एका वर्तमानपत्राच्या एका आवृत्तीतील एकापेक्षा जास्त पत्रकार स्पर्धेत सहभागी होऊ इच्छित असतील तर, त्यांनी केलेल्या अर्जापैकी एकाच पत्रकाराच्या साहित्याची निवड करुन संबधित संपादक संबंधित समितीकडे पाठवितील. वृत्तपत्र बातमीदाराचे साहित्य अनेक वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेले असेल तर त्यासंबंधीचा एकत्रित अर्ज त्या संपादकांपैकी कोणतेही एक संपादक संबंधित समितीकडे पाठवितील.

७) जिल्हास्तरीय पारितोषिकासाठी संबंधित जिल्ह्यातून प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे / नियतकालिके यामधून प्रसिध्द झालेले साहित्य विचारात घेण्यात येईल. सदर वृत्तपत्रे / नियतकालिके यांच्या प्रत्येक आवृत्तीच्या एकाच पत्रकारास संबंधित आवृत्तीत प्रसिध्द झालेल्या साहित्यासंदर्भात अर्ज करता येईल.

८) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या अ,ब,क वर्गवारीतील वृत्तपत्रे / नियतकालिके यामधून प्रसिध्द झालेल्या साहित्याचाच वरील पारितोषिकांसाठी विचार करण्यात येईल.

९) पुरस्कारासाठी गठित निवड समित्यातील सदस्य या स्पर्धेत सहभागी होवू शकणार नाहीत.

१०) प्रत्येक जिल्हयातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या पत्रकारांचे विभागीय स्तरावरील पारितोषिकांसाठी आपोआप नामनिर्देशन होईल.

११) प्रत्येक विभागातून प्रथम क्रमांक मिळविलेल्या पत्रकारांचे राज्य स्तरावरील पारितोषिकांसाठी आपोआप नामनिर्देशन होईल.

१२) अर्जदारांनी सदर परिशिष्टातील प्रपत्र १ येथे विहित नमून्यातील आपला अर्ज **<u>तीन प्रतीत</u>** संबंधित जिल्हास्तर, विभागीय स्तर व राज्यस्तर समित्यांकडे दरवर्षी दिनांक १५ जून पूर्वी पोहचेल असा पाठवावा. दिनांक १५ जून नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१३) जिल्हास्तरीय समिती प्राप्त अर्जांसोबतच्या साहित्याचे पुढील अनुक्रमांक ३. मधील निर्धारित निकष व द्यावयाचे गुण यानुसार परीक्षण करुन प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ येणाऱ्या उमेदवारांची नावे दिनाक ५ जुलै रोजी प्रथम पुरस्कार प्राप्त उमेदवाराच्या साहित्यासह संबंधित विभागीयस्तर समितीकडे गोपनीयरीत्या पाठवील. तसेच आपला निकाल विभागीय समितीमार्फत गोपनीयरीत्या शासनास सादर करील.

१४) विभागीयस्तर समिती प्राप्त अर्जांसोबतच्या साहित्याचे पुढील अनुक्रमांक-३. मधील निर्धारित निकष व द्यावयाचे गुण यानुसार परीक्षण करुन प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ येणाऱ्या उमेदवारांची नावे दि.२० जुलै प्रथम पुरस्कारप्राप्त उमेदवाराच्या साहित्यासह नामनिर्देशनासाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठवील.

१५) राज्यस्तर समिती प्राप्त अर्जांसोबतच्या साहित्याचे पुढील अनुक्रमांक ३. मधील निर्धारित निकष व द्यावयाचे गुण यानुसार परीक्षण करुन प्रथम, व्दितीय व तृतीय येणाऱ्या उमेदवारांची नावे दिनाक ९ ऑगस्ट रोजी घोषित करेल.

१६) जिल्हास्तर व विभागस्तरावरील प्रथम परितोषिकासाठी पात्र ज्या उमेदवारांची नावे अनुक्रमे विभाग व राज्यस्तरावर पाठविण्यात आलेली होती त्यास्तरावर ती बक्षिसासाठी पात्र न ठरल्यास त्यांची यथास्थिती जिल्हास्तर व विभागस्तरावरील निवड अबाधित राहिल.

१७) राज्यस्तरीय समिती जिल्हास्तर व विभागस्तरावरील प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त उमेदवारांची नावे दि. ९ ऑगस्ट रोजी घोषित करील.

३. निकष व द्यावयाचे गुण

| अ.क्र. | तपशिल | कमाल गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| | **१) संख्यात्मक** | | |
| १.१ | मोहिमेबाबत प्रतिवर्षी २ मे ते पुढील वर्षातील १ मे या कालावधीत अर्ज़दाराच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्या, वृत्तांकन, फोटोफिचर्स यांची संख्या | १५ | |
| १.२ | मोहिमेबाबत एकूण प्रसिध्द केलेल्या लेख, अग्रलेख, लेखमालांची संख्या | २५ | |
| | **एकूण** | **४०** | |
| | **वरील १.१ व १.२ येथील बातमी, वृत्तांकन, लेख, अग्रलेख, लेखमाला ज्यात प्रसिध्द झाली आहे त्या एकूण दैनिक, नियतकालिकांची अ,ब,क वर्गवारीनिहाय संख्या** | | |
| | अ) जर सदर साहित्य अ वर्गवारीतील दैनिके, नियतकालिके यामधून प्रसिद्ध झाले असेल तर त्याला मिळालेल्या एकूण गुणांच्या १० टक्के जादा गुण (Weightage Marks) एकूण गुणात मिळविण्यात येतील. | एकूण गुणाच्या १०% जादा गुण | |
| | ब) जर सदर साहित्य ब वर्गवारीतील दैनिके, नियतकालिके यामधून प्रसिद्ध झाले असेल तर त्याला मिळालेल्या एकूण गुणांच्या ५ टक्के जादा गुण (Weightage Marks) एकूण गुणात मिळविण्यात येतील. | एकूण गुणाच्या ५% जादा गुण | |
| | **एकूण (१.१ + १.२)** | **४०+जादा गुण** | |
| | **२. गुणात्मक** | | |
| २.१ | बातमी/लेखामध्ये सुचविलेल्या सुधारणांची | | |
| | अ) कल्पकता | १० | |
| | ब) प्रबोधनात्मकता | ०५ | |
| | क) व्यावहारिकता/उपयोगिता | १० | |
| | **एकूण (२.१)** | **२५** | |
| २.२ | अ) मोहिमेच्या अंमलबजावणी संदर्भात सुचविलेल्या सुधारणापैकी कोणत्या सुधारणांची दखल घेऊन मोहिमेच्या अंमलबजावणीत किती व कोणत्या गावात बदल करण्यात आला, असा बदल केला असल्यास, बदलाची व्याप्ती- **(टीप** :- ज्या गावांनी या सुधारणा केल्या त्याचा तपशील व आनुषंगीक माहिती लेखासोबत दिलेली असेल त्या आधारे गुण देण्यात यावेत.) | १० | |
| | ब) बातमी, लेखामध्ये सूचविलेल्या धोरणात्मक सुधारणांपैकी किती सुधारणांची दखल घेवून शासनाकडून धोरणात सुधारणा करण्यात आल्या असल्यास, त्याचा तपशील- | १० | |

| | | | |
|---|---|---|---|
| | क) बातमी, वृत्तांकन, लेख, अग्रलेख, लेखमाला, फोटोफिचर्स यांचा जनमानसावरील परिणाम/प्रभाव (वाचकांची पत्रे, अभिप्राय इत्यादीवरुन) | १० | |
| | ड) संबंधित पत्रकाराने महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेची अंमलबजावणी व्यापक स्वरुपात व्हावी म्हणून प्रत्यक्ष कृतीपूर्ण पद्धतीने बजावलेली सकारात्मक भूमिका- | ०५ | |
| | **एकूण (२.२)** | **३५** | |
| | **एकूण (२.१ + २.२)** | **६०** | |
| | **एकूण सर्व (१.१ +१.२+ २.१ +२.२)** | **१००+जादा गुण** | |

# परिशिष्ट ८

## प्रपत्र १

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

## प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार- अर्जाचा नमुना

प्रति,

सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय समिती / विभागीयस्तर समिती / राज्यस्तर समिती,
........................................

१. पूर्ण नाव -
२. पत्ता -

३. जन्मतारीख -
४. शिक्षण -
५. प्रत्रकारितेतील अनुभवाचा कालावधी -
६. विकासविषयक पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा संक्षिप्त तपशील (तपशील स्वतंत्र कागदावर द्यावा.) -
७. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या प्रचार प्रभावी व यशस्वीरीत्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेला दिलेल्या वस्तुनिष्ठ प्रसिद्धी साहित्याचा तपशील -

| अ.क्र. | वृत्तपत्र / नियतकालीक | भाषा | वर्गवारी | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |

ठिकाण :
दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी.

**अग्रेषित करणारे संपादक -**

नाव
वृत्तपत्र
वृत्तपत्राचे कार्यक्षेत्र
स्वाक्षरी

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.